# पॅलिंड्रोम



## दोन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक

लेखक: श्रीनिवास शारंगपाणी

# पॅलिंड्रोम

## (संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक)

श्रीनिवास शारंगपाणी

ई साहित्य प्रतिष्ठान

# पॅलिंड्रोम

लेखक:- **श्रीनिवास शारंगपाणी.**

७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
बँक ऑफ इंडियासमोर,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com

मुखपृष्ठ – श्रीनिवास शारंगपाणी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन **:-** १६ मे २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्रीनिवास शारंगपाणी—साहित्यिक परिचय




| | |
|---|---|
| जन्म | ३० ऑक्टोबर १९४९ रत्नागिरी येथे |
| शिक्षण | इंजिनियरिंग पदवी |
| नोकरी | १९७३-२००९ वाहननिर्माण कंपन्यांमध्ये उत्पादन विकास क्षेत्रात. त्यानंतर तांत्रिक सल्लागार |
| लेखनप्रारंभ | १९६६ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान सुरुवात कविता आणि लेखांपासून. |
| प्रारंभीचे लेखन | स्वराज्य साप्ताहिकामध्ये कविता, वाङ्मयशोभा मासिकात लेख तसेच नवल मासिकामधून शास्त्रीय नवलकथा आणि गूढकथा. |
| नियमित लेखन | • मराठी/इंग्रजीतून विज्ञान/ विनोदी/ गूढकथा, कविता, गीते, कादंबऱ्या, नाटके इ. चे लेखन.<br>• रविवार दै. प्रभातच्या “रूपगंध” पुरवणीत मार्च २०१९पासून नियमित स्तंभलेखन |

**प्रसिद्ध साहित्य**

- सकाळ, साप्ताहिक सकाळ, केसरी, अमृत, मोहिनी आणि नवल यांसारख्या दर्जेदार अंकांतून लेख, कविता, कथा.
- मराठी कादंबरी—राजकीय रोमांचिका "षडयंत्र" १९९२मध्ये प्रसिद्ध. २०१९मध्ये पुनर्प्रकाशित
- चित्रपटसृष्टीवरील मराठी कादंबरी--"इये स्वप्नांचिये नगरी" २००९मध्ये प्रसिद्ध. २०१८मध्ये पुनर्प्रकाशित
- "Manipulations" ही "षडयंत्र"ची स्वत:च अनुवाद केलेली इंग्रजी कादंबरी अमेरिका / कॅनडा येथे २००२ मध्ये प्रसिद्ध
- "Brahma's Breath" ही इंग्रजी विश्व-उत्पत्तीविषयीची विज्ञानकाल्पनिका आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्था Smashwords यांनी २०११ मध्ये प्रसिद्ध केली
- "Our Distant Cousins" ही मंगळमोहिमेवरची भविष्यवेधी विज्ञान काल्पनिका जर्मन प्रकाशनसंस्थेने २०१३ मध्ये प्रकाशित केली.
- "Death of A Mad Mathematician" हे इंग्रजी नाटक विख्यात गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व अकाली मृत्यूवर लिहिले असून त्याचे स्वतंत्र थिएटर्स यांनी हिंदीमध्ये रूपांतरण करून ते २०१७मध्ये रंगमंचावर आणले. आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर आकाशवाणीवर ८ भागात प्रसारित.
- "प्रीतिसंभव" हे मराठी संगीत नाटक लिहिले असून त्यातील २७ नाट्यपदे लिहिली आहेत.
- काही मराठी नाटके व एक एकांकिका यांचे लेखन.

- शून्याचा शोध लावणाऱ्या ब्रह्मगुप्ताच्या जीवनावर इंग्रजी नाटक "Value of Nothing" रंगमंचावरील सादरीकरणासाठी तयार.
- "विज्ञान-गूढकथा" हा विज्ञान आणि गूढकथांचा संग्रह २०११मध्ये प्रकाशित.
- "पॉलिकिलर्स व इतर विज्ञानकथा" हा विज्ञानकथा २०१९ मध्ये विश्वकर्मातर्फे प्रकाशित.
- मराठी कथासंग्रह 'कथा कॅथार्सिस' नुकताच प्रसिद्ध झाला
- इंग्रजी कादंबरी 'Shining Darkness' लवकरच प्रकाशित होत आहे.
- शालेय कुमारांसाठी आश्लेषा महाजन यांनी लिहिलेल्या ७० मराठी कवितांचे इंग्रजी गेय कवितांमध्ये मी रूपांतर केले असून ते "School दुनिया" या रूपात २०१३मध्ये प्रसिद्ध.
- मी लिहिलेल्या ९ गीतांचा "ओठात धुंद मदिरा" हा आल्बम उपलब्ध आहे. याचा गीतकार मी असून संगीतकार शरद करमरकर आहेत आणि गीते रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर आणि स्वत: शरद करमरकर यांनी गायलेली आहेत. त्यातील ५




हे नाटक ई साहित्यतर्फे प्रकाशित झाले आहे.
कव्हरवर क्लिक करताच उघडेल

a

गीते आकाशवाणीने स्वीकारली असून ती वरचेवर प्रक्षेपित केली जातील.

- पटकथा लिहिण्याचा अनुभव

**विशेष गौरव**

- षडयंत्र या कादंबरीचा साप्ताहिक सकाळच्या १९९२मध्ये प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट पुस्तकांच्या यादीत समावेश
- याच कादंबरीचा सातारा साहित्य-संमेलनात उत्कृष्ट पुस्तक असा नामोल्लेख
- "Brahma's Breath" साठी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप यांची प्रशस्ती.
- "Our Distant Cousins" या कादंबरीचे "अतिदूरचे बांधव" हे आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर ISROचे माजी संचालक सुरेश नाईक आणि विख्यात खगोलज्ञ अरविंद परांजप्ये यांनी गौरविलेले आहे.
- "विळखा" या कथेला पुणे पोस्ट पाक्षिकाने आयोजिलेल्या कथा स्पर्धेमध्ये पारितोषिक.
- Death of A Mad Mathematician या नाटकाच्या हिंदी रूपांतराच्या सादरीकरणाचा वृत्तपत्रांनी गौरव केला आहे.

**इतर उपक्रम**

सामान्यांसाठी उपयुक्त संशोधन आणि नवनिर्मिती, शास्त्रीय विषयांवर देश-विदेशातून व्याख्याने व सादरीकरणे. आकाशवाणीवर व इतरत्र अनेक भाषणे व कथाकथन. ४०हून अधिक देशांमध्ये प्रवास आणि अनेक देशात तज्ञ सल्लागार या नात्याने काम. शास्त्रीय संशोधनाबद्दल एक पेटंट प्राप्त व काही विचाराधीन.

# अर्पणपत्रिका

पॅलिंड्रोम हे सामाजिक नाटक मी मानवी मूल्यं आणि त्यांचे स्वभावविशेष यांचं प्रभावी चित्रण करणाऱ्या शेक्सपिअर या महान् नाटककाराला समर्पित करीत आहे..

# मनोगत



उलट-सुलट कसंही वाचलं तरी तेच असणारी वाक्यं, संख्या किंवा शब्द म्हणजे पॅलिंड्रोम. आरंभ आणि शेवट हा सारखाच असल्यानं जीवनही एक पॅलिंड्रोमच आहे. शिवाय त्याला लहान-मोठे पॅलिंड्रोम सतत चिकटलेले असतात.

सुखाच्या सदैव शोधात असलेल्या मानवी जीवनात सुखाचे अनेक अर्थ आणि अन्वय असू शकतात. भौतिक सुखाचा पाठलाग करताना कधीकधी माणसं मूल्यांचा आणि जीवनाच्या हेतूला विसरतात. मग त्या सुखाचा लाभ झाल्यावर तो क्षणभंगुर आणि विनाशकारी ठरू शकतो. सद्विचाराला तिलांजली देऊन सुखाचा पाठलाग करताना कुठला पॅलिंड्रोम प्रकट होतो ते दाखवणारं हे दोन अंकी नाट्य.

*श्रीनिवास शारंगपाणी*

पुणे—मार्च २०२३

# प्रस्तावना

श्रीनिवास शारंगपाणी यांचं नाटक "डेथ ऑफ अ मॅड मॅथेमॅटिशियन" हे आम्हाला स्वतंत्र थिएटर आणि फिल्म ग्रुपला खूपच आवडलं. ते नाटक इंग्रजीत होतं आणि आम्ही फक्त हिंदी नाटकं रंगमंचावर सादर करीत असल्यामुळे काय करायचं हा प्रश्न पडला. परंतु आम्ही संपूर्ण ग्रुपमध्ये नाटकाविषयी चर्चा करीत असल्यामुळे ग्रुपमधील उत्साही तरुणांनी नाटकाचा हिंदी अनुवाद करायचं मनावर घेतलं आणि नाटक रंगमंचावर आलं. सर्व मोठ्या वृत्तपत्रांनी नाटकाचं कौतुक केलं आणि आम्हाला खूप समाधान वाटलं.

या नाटकावर काम सुरू असताना श्रीनिवास शारंगपाणी यांच्याशी परिचय झाला आणि ते खूप प्रभावी लेखक आहेत याची जाणीव झाली. मानवी स्वभावविशेष, त्यातील चढ-उतार आणि येणाऱ्या परिस्थितीशी मुकाबला करताना होणारा संघर्ष याचं त्यांच्या नाटकात उत्कृष्टपणे चित्रण केलेलं असतं. 'पॅलिंड्रोम' हे असंच एक नाटक आहे. संकटातून उद्भवणाऱ्या परिस्थितीला नैतिकतेनं सामोरं न जाता लोभ जेव्हा मानवी मनाची पकड घेतो तेव्हा काय घडतं हे या नाटकातून अधोरेखित केलं आहे. उलट-सुलट वाचलं तरी तसेच राहणारे शब्द, वाक्यं किंवा संख्या यांना पॅलिंड्रोम म्हणतात. या संकल्पनेला मानवी जीवनाशी जोडून शारंगपाणी या नाटकाद्वारे खोलवर विचार करायला लावतात.

a

या नाटकाचा वाचक / प्रेक्षक यांच्यावर अपेक्षित परिणाम नक्की होईल. नाटकाचे अधिकाधिक प्रयोग व्हायला हवेत. एक चांगलं नाटक लिहिल्याबद्दल शारंगपाणी यांचं अभिनंदन आणि प्रयोगांसाठी खूप शुभेच्छा.

—***अभिजीत चौधरी***

**संस्थापक आणि संचालक**

**स्वतंत्र थिएटर आणि फिल्म्स – पुणे.**

a

# पॅलिंड्रोम

(स्वतंत्र सामाजिक दोन अंकी नाटक)

**पात्र परिचय**

१ यशवंता: कनिष्ठ मध्यमवर्गीय, सरकारी नोकरीतील कारकून

२ शालिनी (शालू): यशवंताची पत्नी

३ रोहित: शालिनी-यशवंता यांचा एकुलता एक मुलगा (हे पात्र रंगमंचावर येत नाही)

४ पंडितराव: यशवंताचे फॅमिली फ्रेंड, फिलॉसॉफर, गाइड

५ बाबू (जीवन): शालिनीचा महत्वाकांक्षी सख्खा भाऊ

६ घनश्यामशेट: नगरशेट (हे पात्र रंगमंचावर येत नाही)

७ दीपा: घनश्यामशेटची घमेंडखोर एकुलती एक मुलगी – बाबूची मैत्रीण

८ रश्मी: घनश्यामशेटच्या ऑफिसात काम करणारी मध्यमवर्गीय तरुणी – बाबूची मैत्रीण

—०0०—

## अंक पहिला

### प्रवेश १

(पडदा उघडतो तेव्हा मध्यमवर्गीय घरातील बाहेरची खोली. डावीकडे घरात येण्याचा दरवाजा. समोर आत म्हणजे स्वैपाकघर-कम-स्टोअर रूमकडे जाण्यासाठी दरवाजा. या दरवाज्याला पडदा. भिंतीवर लोअर मिडल क्लासचा छाप, देवादिकांच्या आणि पूर्वजांच्या तसबिरी व एखाद-दुसरे फ्रेम केलेले भरतकाम. एका कोपऱ्यात एक टेबल. त्यावर लाल फितीनं बांधलेले सरकारी कामाचे कागद पडले आहेत. शाळकरी मुलाची १-२ पुस्तकंही तिथं आहेत. दोन साध्या लाकडी खुर्च्या. एक आरामखुर्ची, एक तिपाई असं जुनाट फर्निचर. एका कोपऱ्यात एक कॉट. जमिनीवर जुनाट मळकट सतरंजी. टेबलावर एका चिनीमातीच्या बरणीत मनी प्लँट—थोडेसे पिकलेले, जीर्ण. टेबलाजवळ एक जुनाट कपाट. शालू पुस्तकं आवरून ठेवत आहे—धूळ झटकत आहे. वेळ संध्याकाळची. टेबलावरचे अलार्म घड्याळ ६.३०ची वेळ दाखवीत आहे.)

शालू: (स्वत:शी पुटपुटत) शी:, काय घाण! घर आहे की उकिरडा? मला मेलीला एक क्षणही उसंत नाही. हा उकिरडा उपसता उपसताच जीवन संपायचं. (पुस्तकं आणि कागद व्यवस्थित लावण्याचा प्रयत्न करते.) काय उपयोग या कागदी कपट्यांचा? हे सरकारी कागद म्हणजे सवतीसारखे आहेत अगदी! ह्यांना तर ना ऑफिसच्या कामापायी बायकोकडे बघायलाही फुरसत नाही. कधी मेलं हे असलं जीवन

बदलेल काही समजत नाही. (बाबू हळूच मागे येतो आणि शालूचे डोळे झाकतो. ती सोडवण्याचा प्रयत्न करते) कोण आहे?

बाबू: तूच आत्ता म्हणालीस की—जीवन—लाईफ—म्हणजे मीच. जीवन ऊर्फ तुझा लाडका भाऊ बाबू!

शालू: बस, बस. पुरे झाली चेष्टा! कंटाळा आलाय् या सगळ्याचा अगदी!

बाबू: (समजावणीच्या सुरात) हे सगळं बदलून टाकता येईल. मागंच मी तुला सांगितलं होतं ताई.

शालू: ते धंद्याचं ना? ते काय असं सहजासहजी जमणारे का? भांडवल कुठून आणायचं?

बाबू: हं: त्यात काय? जमवायचं थोडं इकडून-तिकडून.

शालू: वा रे वा! म्हणे इकडून तिकडून. इकडे अन् तिकडे काय पैशाची झाडं लागल्येयत काय?

बाबू: लागली नाहीत पण लागतील. (मनी प्लँटकडे जात) हे रोडावलेलं मनी प्लँट की नाही अगदी टरारून फुलेल बघ! बरं सध्या तरी याला मिठाचं पाणी घाल बघू. बघू या काही फरक पडतोय् का.

शालू: (बाबूच्या पाठीवरून हात फिरवीत) बाबू, बघ की रे एखादी चांगलीशी नोकरी. नोकरीला लागलास ना की वर्षात तुझं लग्न लावून देईन बघ एखाद्या चांगल्या मुलीशी. (दूरवर बघत) तू मागं सांगत होतास ना ती कोणतीशी मैत्रीण आहे तिच्याबद्दल—तिच्याशीच लावून देईन. पण हे असे दिवस वाया घालवू नकोस रे राजा. हे तरुणपणाचे दिवस एकदा गेले ना की परत येत नाहीत. ते कुठलंसं झाड असतं ना—

त्याच्यासारखे. त्या झाडाला म्हणे त्याच्या आयुष्यात एकदाच बहर येतो. एकदा येऊन गेला ना की पुन्हा कध्धी नाही! ऐक रे माझं.

बाबू: ताई, कमी का केले मी प्रयत्न मी? पण आता मलाही कंटाळा आलाय् ॲप्लिकेशन्स खरडायचा अन् इंटरव्ह्यूच्या वाऱ्या करायचा. माझं ना त्यात मनच लागत नाही. मला वाटतंय् की नोकरी मला जमणारच नाही अन् माझ्या नशिबातच नाहीय्.

शालू: मग पोट कसं भरणारेस?

बाबू: काहीतरी धंदा करायचाय्. कष्ट उपसायची तयारी आहे आपली.

शालू: अरे पण एवढं सोपं आहे का ते? त्याला भांडवल पाहिजे; जागा पाहिजे. एक ना दोन—लाख भानगडी.

बाबू: ताई, तू मला सांगत्येयस्? क्लास मिळाला नसला तरी बी.कॉम. ची डिग्री चिकटवून आहे मी. तेवढंच फक्त बिनसलं अन् या वाऱ्या करायला लागतायत्.

शालू: तुला समारंभांच्या काँट्रॅक्टचा धंदा करायचं बरेच दिवसापासून मनात आहे ते माहित्येय् मला. पण ह्यांच्याबरोबर भागीदारी करायची कल्पना तू मनातून काढून टाक. एक तर धंदा-बिंदा ह्यांना जमणार नाही अन् दुसरं म्हणजे तुझ्या—

बाबू: (कावून) माझ्याबद्दल यशवंतरावांचं मत चांगलं नाही हेच ना? कुणाचं मत माझ्याबद्दल चांगलं आहे? अगदी तुझं सुद्धा नसेल! होय. मी व्हॅगॅबाँड आहे; नालायक, मवाली, चारसो-बीस आहे हेच ना? हे

a

सग्गळं खरं आहे—कारण मला तुमच्यासारखे नोकरी-व्यवसाय नाहीत ना.

शालू: (समजावणीच्या सुरात) तसं नव्हे रे पण तू समजून का घेत नाहीस?

बाबू: अन् तुम्ही का मला समजून घेत नाही? ताई, ते काही असो—मी आयुष्यात काय वाट्टेल ते करीन—केलंयही—पण हा बाबू एक दिवस जीवनशेट म्हणून जगात वावरताना दिसेल.

शालू: जाऊ दे ते सर्व. स्वस्थ बैस बघू इथं. चहा टाकते तुझ्यासाठी.

बाबू: नको चहा-बिहा मला आत्ता. मी जरा घाईत आहे. मला शंभर-एक रुपये देशील? उसने?

शालू: शंभर रुपये? ते रे कशाला तुला पाहिजेत?

बाबू: काम आहे जरा माझं…

शालू: काम? कसलं काम?

बाबू: तुझा विश्वास नाही का माझ्यावर?

शालू: अरे, विश्वासाचा काय प्रश्न आहे? अन् तुझा माझ्यावर आहे ना? मग सांगायला काय हरकत आहे?

बाबू: (अडखळत) म्हंजे—म्हंजे काय आहे की…

शालू: हे बघ—लाजू नकोस. स्पष्ट काय ते सांग.

बाबू: यशवंतरावांना सांगणार नाहीस ना? आधीच त्यांचं माझ्याबद्दल चांगलं मत नाहीय्.

शालू: नाही सांगणार—पण बोल तरी.

बाबू: मैत्रिणीला घेऊन जरा बाहेर जायचंय्. बरेच दिवस तिला बाहेर फिरायला कुठं घेऊन गेलो नाहीय्.

शालू: मग आता याच्यापुढं तू तिच्याकडे जाणार अन् मग तिला घेऊन बाहेर पडणार?

बाबू: छे, छे. तिला इथंच खाली उभं केलंय्.

शालू: बाबू, बाबू, अरे किती वेडा आहेस रे तू. असं तिला एकटीला तिष्ठत उभं ठेवायचं का?

बाबू: (चिडून) मग तिला इथं घेऊन येऊन तिच्यासमोर तुझ्याकडे पैसे मागू काय? एक निरोप सांगायचाय् म्हणून थाप ठोकली अन् आलो इथं.

(शालू आत जाऊन शंभराची एक नोट घेऊन येते.)

शालू: हे बघ. मी साठवलेल्या पैशातून तुला देत्येय्. तुला माहीतच आहे की आमच्याकडेही कशी ओढाताण चालल्येय् ती. कधी अडचण आली तर मलाच माझ्याकडचे पैसे खर्च करावे लागतात. तेव्हा…

बाबू: (खूष होऊन तिच्या हातातले पैसे जवळ-जवळ ओढूनच घेतो.) लौकरात लौकर परत कर असंच ना? दिले. आपल्याला कुणाची उधारी फार काळ ठेवायची सवय नाही. यशवंतराव कधी येतात? आणि रोहित दिसत नाही.

शालू: हे यायची वेळ झालीय् खरी पण त्यांचा काही नेम नसतो. काम असलं तर उशीरही होतो बऱ्याचदा. रोहित गेलाय् मित्राकडे. खेळून झाल्यावर

a

त्याच्याचकडे अभ्यासाला बसेल आणि येईल जेवायच्या वेळेला. बाबू, तुझ्या मैत्रिणीला घेऊन ये ना. बघू दे तरी मला तिला…

बाबू: आत्ता नको. पुन्हा कधी तरी घेऊन येईन.

शालू: अरे, असं काय करतोयस्. जा ना घेऊन ये तिला—फक्त पाचच मिनिटं. मग जाऊ देईन तुम्हाला. मग तर झालं?

बाबू: ओके. पण पाचच मिनिटं हं! (बाहेर जातो. दूरवरून 'रश्मी, रश्मी' अशा त्याच्या हाका ऐकू येतात. थोड्या वेळानं दोघेही आत येतात. रश्मी दारापाशीच उभी राहते.)

शालू: (तिच्याजवळ जाऊन) ये ना ग आत. बैस इथं अशी. काय नाव तुझं?

रश्मी: रश्मी.

शालू: गोड आहे नाव—अन् तू पण! किती दिवसांपासून मैत्री आहे तुमची?

रश्मी: दीड-दोन वर्षं.

शालू: काय करतेस तू?

रश्मी: बी.सी.ए. झाल्येय्. एका कंपनीत कंप्यूटर ऑपरेटर म्हणून नोकरी करते.

शालू: छान, छान. खरं तर तुम्हाला चहा-पाणी करायला पाहिजे कारण रश्मी तर प्रथमच आल्येय् इथं. पण बाबूला—जीवनला मी कबूल केलंय् की मी तुम्हाला जास्त वेळ इथं थांबवून ठेवणार नाही म्हणून.

रश्मी: येईन ना मी पुन्हा तुमच्याकडे.

बाबू: (शालूकडे वळून) निघू मग आम्ही?

शालू: ठीक आहे. जपून जा हं. बाबू, हिला अंधार पडायच्या आत घरी पोचव बरं का?

बाबू: अर्थात्. निघतो आम्ही.

(जातात.)

शालू: (स्वत:शीच) किती गोड आहे मुलगी! नीट-नेटकी वाटते. अशी मुलगी मिळायला खरंच भाग्य लागतं. (मनीप्लँटकडे जाते आणि निरखून पाहते) बाबू म्हणतो तसं मिठाचं पाणी घालून बघितलं पाहिजे. फारच सुकलंय्. (आत जाऊन एका भांड्यातून पाणी घेऊन येते. तेवढ्यात दारावर टकटक. भांडं टेबलावरच ठेवून दाराकडे वळते. पंडितराव येतात. कोपऱ्यात काठी ठेवतात आणि आत येऊन तिथल्याच खुर्चीत बसतात.)

पंडितराव: काय म्हणताय् शालिनीबाई? सगळं ठीक आहे ना?

शालू: चाललंय् कसं तरी. ओढाताण होत्येय् पण रेटतोय् संसाराचा गाडा. रोहितच्या शिक्षणासाठी तरतूद केली पाहिजे. शिक्षणाचे खर्च आजकाल आकाशाला भिडलेत. पण काहीही असो त्याला शिकवून खूप मोठ्ठं करायचं ठरवलंय् आम्ही. (मनीप्लँटला मिठाचं पाणी घालते.)

पंडितराव: हं. हे काय करत्येयस्?

शालू: मिठाचं पाणी घातलं तर मनीप्लँट फोफावेल असं बाबू म्हणत होता.

पंडितराव: आपल्या घामाच्या मिठाचं पाणी घातल्याशिवाय संसारातला मनीप्लँट फुलणार कसा? बरं ते असू दे. अर्थमंत्री यशवंतराव अर्थार्जनासाठी बाहेर गेलेत ते अजून आले नाहीत का?

शालू: खरं तर यायला हवेत एव्हाना…

पंडितराव: आणि रोहित?

शालू: रोहित ना? रोहित गेलाय् मित्राकडे. खेळून झाल्यावर त्याच्याचकडे अभ्यासाला बसेल आणि येईल जेवायच्या वेळेला.

पंडितराव: मोठा गोड पोरगा आहे. त्याला खूप-खूप शिकू दे. आणि हो—नुसतंच पुस्तकी शिक्षण नको. सर्व बाजूंनी परिपूर्ण होऊ दे—कलेत, खेळात—सगळ्या गोष्टीत त्याला भाग घेऊ दे. माहित्येय् ना?

*साहित्य-संगीत-कलाविहीन:*
*साक्षात् पशु: पुच्छ-विषाणहीन:|*
*तृणं न खादन्नपि जीवमानस्तद्भागधेयं परमं पशूनाम्||*

त्याच्यावर सगळे चांगले संस्कार होऊ देत. स्वतंत्र विचार करायची क्षमता त्याला येऊ दे.

शालू: अहो, पण अजून तो लहान आहे.

पंडितराव: असू दे तो लहान. लहानपणापासून केलेलं संस्कारांचं वळणच जास्त उपयोगी पडतं.

शालू: तुम्ही असं काही तरी चांगलं सांगता म्हणूनच धीर येतो. नाहीतर फार काळजी वाटत असते मला.

a

पंडितराव: *सजीवं दहते चिंता, निर्जीवं दहते चिता*| अशी काळजी करत राहिलं तर कसं होईल? आता काळजी कसली करत्येयस?

शालू: काय सांगायचं? नेहमीचीच रडकथा. या वाढत्या महागाईमुळं रोजचं जगणं जिथं मुष्किल झालंय् तिथं मुलांचं संगोपन करणंसुद्धा किती दुरापास्त झालंय् ते काही सांगायलाच नको.

पंडितराव: तुम्हाला तर एकच मुलगा आहे. पण तू म्हणतेस तेही खरं आहे. तरी पण धीर धरून परिस्थितीशी झगडा करायला हवा. असं निराश होऊन चालणार नाही. यत्न केलाच पाहिजे. *येत्न तो देव जाणावा.*

शालू: एकच मुलगा आहे तरी ही परिस्थिती. आणखी मुलं असती तर काय झालं असतं. बापरे!

पंडितराव: आहे, जरा अवघड काम आहे खरं पण धीरानं घेतलं तर अशा अवघड गोष्टी सुद्धा पार पाडता येतात.

शालू: आधी आम्हाला मूल होत नव्हतं म्हणून किती काळजी. मी त्यावेळी सारखी आजारी असायची. त्याची तुम्हाला कल्पना आहेच. ती डॉक्टरांची भरमसाट बिलं भागवण्यासाठी यांनी कर्ज काढली ती आम्ही अजून फेडतोय! यांची सरकारी नोकरी. बोलू नये पण या पगारात आमचं अजिबात भागत नाही. ह्यांचं आणि त्यांच्या बॉसचं मागं केव्हा तरी बिनसल्यापासून गेली कित्येक वर्षं त्यानं ह्यांना प्रमोशन दिलं नाहीय्. उलट मध्ये एकदा ट्रान्स्फरच केलीवती. फार दूर नव्हती म्हणून बरं झालं. पुन्हा इथं ट्रान्स्फर करून घ्यायला केवढी यातायात झाली!

पंडितराव: हो, आठवतंय् ना. चार वर्षांपूर्वीची गोष्ट असेल.

शालू: हो. रोहित पाच-एक वर्षांचा असेल तेव्हा. काय तारांबळ झाली आमची त्यावेळी! हे जॉईनही झाले. आठ एक महिने राहिले सुद्धा नागपूरला. हातापाया पडून इकडे पुन्हा ट्रान्स्फर करवून घेतली.

पंडितराव: मग तर बॉसचं चांगलंच फावलं असेल!

शालू: होय ना. अन् आमचे हे भोळे सांब आहेत. मुकाट्यानं सगळं सहन करतील.

पंडितराव: यशवंताचं एका दृष्टीनं बरोबर आहे. विरोध केला तर आणखी त्रास होईल. ट्रान्स्फर्स, रिपोर्ट हे सगळं बॉसच्याच हाती असतं. इफ यू कांट रेझिस्ट, यू मस्ट फेस इट!

शालू: पण मग या दुष्टचक्रातून सुटण्याचा काहीच मार्ग नाही का?

पंडितराव: यशवंताच्या ऑफिसमधे युनियन वगैरे प्रकार नाहीये का?

शालू आहे ना! पण ती अगदी फुसकी युनियन आहे—नुसती नावाला. अर्थात जबरदस्त युनियन असती तरी ह्यांनी काय केलं असतं हाही प्रश्नच आहे.

पंडितराव: आय सी! याचा अर्थ एकच आहे. यातच थोडंफार ॲडजस्ट करून सुख प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणं. लाइफ इज अ काँप्रमाइज!

शालू: तेच तर चाललंय्. पण सभोवताली वणवा पेटलेला असताना आपण शीतल चांदण्यातून फिरतोय् अशी कल्पना करणं कसं शक्य आहे?

पंडितराव: शालिनी, तू फारच सेन्सिटिव्ह आहेस! अजून एक मार्ग म्हणजे ही नोकरी सोडून दुसरी नोकरी बघणे.

शालू: या वयात ह्यांना कोण दुसरी सुखाची नोकरी देणार?

पंडितराव: (खाली पाहत) हं. प्रयत्न करीत राहणे हा एकच मार्ग.

शालू: म्हणजे तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे यातच सुख मानून दिवस काढायचे—ईश्वरानं यातून आपली सुटका—खरं तर कायमची सुटका—करेपर्यंत.

पंडितराव: शालिनी, आज तू माझ्या समोर सर्व मोकळेपणानं बोलत्येयस म्हणून तुझ्या दु:खाचं ओझं नक्कीच हलकं झाल्याशिवाय राहणार नाही. पण हे लक्षात ठेव की आशेवरच मनुष्य जगत असतो. मनुष्य जन्माला आला की एक गोष्ट त्याच क्षणी नक्की होत असते. कुठली माहीत आहे?

शालू: कुठली?

पंडितराव: मृत्यू! असं म्हणतात की – दि अल्टिमेट ट्रुथ इन धिस वर्ल्ड इज डेथ! म्हणजे या जगातलं अंतिम सत्य मृत्यू हेच आहे! तरी जन्माला आल्या क्षणापासून माणूस जगण्याची सारखी प्राणांतिक धडपड करीत असतो म्हणजेन निश्चित असलेल्या मृत्यूला शक्य तितक्या दूर लोटण्याची तो केविलवाणी धडपड करीत असतो. तो हे सगळं का करत असतो माहीत आहे?

शालू: का?

पंडितराव: आपण मृत्यूला फसवू शकू अशी मूर्ख अन् वेडी आशा त्याला वाटत असते—अगदी मरेस्तोवर—शेवटच्या क्षणापर्यंत!

शालू: पंडितराव, किती खोलवर विचार करता तुम्ही! डोकं अगदी सुन्न होऊन जातं, अन् तुम्ही सांगितलेला शब्द न् शब्द पटण्यासारखा आहे.

पंडितराव: अन् एवढं असून सुद्धा आपण जे जगत असतो त्या जगण्यालाही अर्थ आहेच! कारण ईश्वरानं काही हेतूनंच जीवन निर्माण केलेलं आहे. मृत्यू टाळण्यासाठी माणूस जो संघर्ष किंवा संग्राम करतो तो म्हणजेच त्याचं आयुष्य!

शालू: म्हणजे ज्या युद्धाचा निकाल—अर्थात् पराभव—माहीत असूनही हे युद्ध तो खेळत असतो.

पंडितराव: अगदी बरोबर! पण खरी गंमत तर पुढंच आहे.

शालू: ती कोणती?

पंडितराव: एवढं सगळे करून तो एका मार्गानं मृत्यूवर विजय मिळवतोच!

शालू ते कसं काय?

पंडितराव: मरण नक्की आहे हे कळल्यावर आपल्यानंतर आपला रिप्रेझेंटेटिव्ह हा संग्राम पुढे चालू ठेवील याची खात्री तो करून घेतो.

शालू: म्हणजे त्याची मुलं...!

पंडितराव: करेक्ट!

शालू: याचा अर्थ वंशविस्ताराचा खरा हेतू मृत्यूशी अनंत काळापर्यंत अव्याहत झुंज घेणं असाच होतो की नाही?

पंडितराव: होय. अन् एका अर्थी मानव अमर आहे असंही म्हणायला हरकत नाही. मनुष्य आपल्या संततीला अतिशय जपतो याचं कारण हेच आहे. अन् म्हणूनच आपल्या मुलांवर चांगले संस्कार केले पाहिजेत.

शालू: पण जनावरांचं अन् इतर प्राण्यांचंही असंच असतं का?

पंडितराव: त्यांची मूळ बैठक तशी असली तरी त्यांच्यातील अनेक जाती नष्ट झाल्या अन् माणूस मात्र जगत राहिला. खरं म्हटलं तर माणसाच्या ताकदीच्या मानानं त्या प्राण्यांवर लाखो वर्षांपासून कोसळत असलेली संकटं महाकाय, महाप्रचंड होती. पण झालं काय तर मोठमोठाले शक्तिशाली प्राणी नेस्तनाबूद झाले आणि माणूस मात्र हा सृष्टीचा सगळा चित्रपट धूर्तपणानं पाहत जगत राहिला.

शालू: आपण सगळे या अमर होण्याच्या ध्येयानं असं जगतो आहोत हे लक्षात आलं की किती हसू येतं नाही?

पंडितराव: या ‘आपण सगळे’ मधे मी मात्र नाही!

शालू: हो, कारण तुम्ही ब्रह्मचारी ना!

पंडितराव: याचा अर्थ मी निसर्गापुढे पराभव स्वीकारलेला आहे असं समजायला हरकत नाही!

शालू: अगबाई, बोलण्याच्या नादात मी तुम्हाला चहाबिहाचं विचारायचं विसरूनच गेले! काय घेणार ना तुम्ही चहा?

पंडितराव: हो, हो. घेऊ की—पण आमचा तो स्पेशल बरं का—बिनसाखरेचा. पण आता यशवंता येईलच की. तेव्हाच कर.

a

शालू: अहो त्यांचं काही खरं नाही. कधी कधी ते बऱ्याच उशिरा येतात.

पंडितराव: मग जवळपास कुठंतरी—म्हणजे शेजारी-पाजारी जिथं फोन असेल तिथे फोन करून कळवत नाहीत का?

शालू: अहो, आठवड्यातून चार वेळा उशिरा येणारा माणूस तो काय फोन करणार कपाळ!

पंडितराव: (हसून) उलट एखादवेळेला लौकर यायचं असेल तरच खरं तर फोन करायला हवा! (शालू जोरात हसते अन् आत स्वैपाकघरात जाते. पंडितराव थोडा वेळ टेबलाजवळ जाऊन तिथली पुस्तकं चाळतात. मग खुर्चीवर येऊन स्वस्थ बसतात. दारावर टकटक करून यशवंता आत येतो)

यशवंता: (पायातल्या चपला कोपऱ्यात सरकवीत हातातील फाईल्स टेबलावर ठेवीत) काय पंडितराव, बऱ्याच दिवसांनंतर इकडे फेरी?

पंडितराव: होय. खूप दिवसात इकडे आलो नव्हतो म्हणून म्हटलं मुद्दाम चक्कर मारावी.

यशवंता: वा! बरं झालं. (दरवाज्याकडे तोंड करून) अग शालू—मी आलोय् बरं का.

शालू: (दरवाज्यात येऊन) कळलंय्. तुमचाही चहा टाकलाय मी.

पंडितराव: कसं काय चाललंय्, यशवंता?

यशवंता: चाललंय् आपलं कसं तरी. तुम्ही क्वचितच येणार, तुम्हाला काय नेहमीची रडकथा सांगायची? रेटतोय् आपलं झालं.

a

पंडितराव: अरे दुःखं का कुणाला नाहीत? माझंच बघ. आता हा चहा मी पिणार तो बिनसाखरेचा. मग काय गंमत राहिली त्यात? अन् असा चहा मी गेली कित्येक वर्ष पितोय्. पण तुला एक सांगतो. दुःखं सोसून सोसून जेव्हा शेवटी सुख मिळतं ना त्याची गोडी अवर्णनीय आहे. शूद्रकानं म्हटलंय: *सुखं हि दु:खान्यनुभूय शोभते घनान्धकारेष्विव दीपदर्शनम्|* म्हणजे अंधारात ज्याप्रमाणे दिवा जास्त तेजस्वी दिसतो त्याप्रमाणेच दुःखाच्या पार्श्वभूमीवर सुख जास्त आनंददायी ठरतं.

यशवंता: बालपण दारिद्र्यात काढलं. नंतर तरुणपणी सुखांचा उपयोग घेण्याऐवजी वडिलांनी अन् मी स्वत: करून ठेवलेल्या कर्जाची फेड करण्यात आयुष्याचे महत्त्वाचे दिवस कसे खर्ची पडतायत ते कळतच नाही. कधी संपायचं हे नष्टचर्य ते समजत नाही. दमड्यांचा काटेकोर जमाखर्च जुळवताना देहाची पालवी सुकली कधी अन् कोमेजली कधी ते लक्षातच आलं नाही!

पंडितराव: अरे, हा नशिबाचा भाग झाला. इट्स व्हील ऑफ चान्स!

यशवंता: ईश्वरानं कोणता सूड उगवायचा बाकी ठेवलाय् तेच समजत नाही. संततीसुख सुद्धा इतक्या उशिरा दिलं की या वयात तीही जबाबदारीच जास्त वाटावी. समवयस्क याच काळात आयुष्यातली छोटी मोठी सुखं अनुभवत असताना आपण मात्र खस्ता खायच्या हे काही पटत नाही.

पंडितराव: तुझी परिस्थिती मी समजू शकतो. तरी देखील तू निराश होऊ नये असं मला वाटतं. कारण दैव हातात नसलं तरी प्रयत्न नक्की आपल्याला हातात असतात. अन् आपण ते करत राहायचे.

a

(शालू प्रवेशते आणि पंडितराव आणि यशवंता यांच्या हातात चहाचे कप देते. स्वत:देखील चहा पिऊ लागते.)

शालू: यशवंतराव आणि पंडितजी यांच्यातल्या वाटाघाटी संपल्या की नाही?

पंडितराव: (हसून) वाटाघाटी संपल्या पण निर्णय झाला नाही. (चहा संपवून उठतात. कोपऱ्यातील काठी घेतात) रोहितची काही भेट झाली नाही. हरकत नाही. पुन्हा येईन तेव्हा भेटीन.

शालू: कधी कधी रोहितला अगदी बोलावून आणावं लागतं. मलाच आता त्याला घेऊन यायला पाहिजे.

(पंडितराव व शालू एकदमच घराबाहेर पडतात. रंगमंचावर काही काळ अंधकार.)

a

## प्रवेश २

(पुन्हा प्रकाश—अंधुकसा. एका कोपऱ्यातून, टेबलाजवळ यशवंता बसलेला आहे. एक बारीकसा टेबललँप—त्याच्या प्रकाशात यशवंता कागदपत्रं तपासत बसलेला आहे. शेजारी आरामखुर्ची घेऊन शालू पहुडलेली आहे. दुसऱ्या कोपऱ्यामध्ये त्या मानाने बराच अंधार. इथे जमिनीवरच गादी टाकून रोहित झोपलेला आहे.)

शालू: (जांभई देत) संपलं की नाही तुमचं काम? तुम्हाला खाजगी जीवनच राहिलं नाहीय् अजिबात—सारखं ऑफिसचं काम. (त्रासिक स्वरात) कधी संपणाराय् कोण जाणे!

यशवंता: अग साहेब परवा टूरवर जायचेयत. त्याच्या आत हा रिपोर्ट त्यांना द्यायचाय्. याच्यावरच तर त्यांचं टूरवरचं सगळं काम अवलंबून आहे.

शालू: छान! म्हणजे दिवसरात्र तुम्ही कष्ट उपसायचे अन मलई मात्र साहेबानं खायची—काय?

यशवंता: अग, पण काय करायचं? नोकरी आहे.

शालू: नोकरी सरकारची करताय ना? का साहेबाची?

यशवंता: हे बघ, नोकरी म्हटली की हे सगळं करायलाच लागतं. हे मी तुला यापूर्वी साठ वेळा सांगितलं असेल. हे नाही केलं तर ट्रान्स्फर्स—इतर मार्गांनी त्रास हे. सगळं सहन करावं लागेल.

a

शालू: पण हे असं सगळं कुठवर चालायचं?

यशवंता: जोपर्यंत आपल्याला पैशाची गरज आहे. तोपर्यंत!

शालू: मला काही समजेनासंच झालंय्.

यशवंता: हं. शालू तू आता झोप बघू. रोहित बघ कसा शांत झोपलाय्, दमला असेल बिचारा. तू पण झोप आता. मला अजून अर्धा तास तरी लागेल हे सगळं आवरायला.

शालू: हे तुमचं नेहमीचंच आहे. ते काही नाही. मला आज तुमच्याशी बोलायचंय्. ठेवा ते सगळं बाजूला. उद्या सकाळी ऑफिसला जाण्याच्या आधी करा ते.

यशवंता: अग आता बारा वाजायला आलेत. आत्ता तुला काय बोलायचंय्?

शालू: वाजू देत बारा. इथं सगळ्या आशा आकांक्षांचेच बारा वाजायला लागलेत त्याचं काय?

यशवंता: हे बघ कावू नकोस अशी. ठेवलं सगळं बाजूला. (कागद सरकवून बाजूला करतो) बोल आता काय तुला बोलायचंय् ते!

शालू: अहो आता आपल्याला भविष्याचा विचार करायला हवा!

यशवंता: तो कशाला?

शालू: अहो तो कशाला काय? रोहितचं शिक्षण, आपली पुढची तरतूद, याचा सगळा विचार आत्ताच नको का करायला? शिवाय रोहितच्या मुंजीचंही बघितलंच पाहिजे.

a

यशवंता: आजचा हा अगडबंब खर्च अन् आपली कर्जं—परवडणाराय् का आपल्याला मुंज सध्या?

शालू: पण करायचीय् ना?

यशवंता: करायला तर पाहिजे. पण मग घरच्या घरीच करू म्हणजे फार खर्च येणार नाही.

शालू: अहो पण घरच्या घरी काय करणार कपाळ? ही खोली आणि स्वैपाकघर—दोनच खोल्या आहेत आपल्याकडे—आणि त्याही टीचभर. काय होणार त्यात? दोन्ही भाऊजी, वन्सं यांच्याकडची माणसं. शिवाय माझ्या माहेरची माणसं—थोडीफार. पुष्पाला बोलवायला लागेलच. एखादं लहानसं कार्यालय घ्यायला लागणारच.

यशवंता: आणि बाबूराव आहेत ना तुमचे लाडके. ते आहेतच की मदतीला म्हणजे निदान असं म्हणायला तरी लागेल. जिथं हजार रुपयांचा खर्च असेल तिथं हे महाराज असले की बाराशे सहज लागतील.

शालू: अहो असं काय बोलता हो? नोकरी धंदा नाही म्हणून असे होत असेल बिचाऱ्याच्या हातून. मार्गी लागला ना की सगळंऽऽ ठीक होईल. तुम्ही पण बघा ना जरा त्याच्यासाठी काही तरी.

यशवंता: छान! छान!! माफ कर मला, पण हे सांगू नकोस. खूप अनुभव घेतलेयत त्याचे आत्तापर्यंत. माझे शब्द लक्षात ठेव. त्याची लक्षणं ठीक नाहीयत. आताच आवरला नाही ना त्याला तर एक दिवशी सगळ्यांच्या गळ्याला तात लावेल हा!

शालू: अहो पण आवरायचं म्हणजे काय करायचं? त्याच्यावर कंट्रोल ठेवायला काय लहान आहे का तो?

यशवंता: (चिडून) सांगू तुला—पण तुला आयुष्यात जमायचं नाही. त्याला हृदय फत्तरासारखं कठीण करायला पाहिजे. भलत्याच ठिकाणी माया दाखवून उपयोगी नाही. पैसे मागायला आला ना की सरळ हाकलून लावायला पाहिजे. अरे पैसे काय झाडाला लागतात काय? पंडितराव म्हणतात ना काय तरी—मॉर्बिड पिटी का कायसं. तसली दया काय कामाची?

शालू: तुम्ही ना अगदी टांगायला नेता सगळं.

यशवंता: मी म्हटलंच होतं ना तुला पटायचं नाही म्हणून. जाऊ दे. बाबूचा विचार करण्यापेक्षा रोहितचा विचार करायला पाहिजे. अन् मुख्य म्हणजे त्याला त्याच्या या मामापासून दूर ठेवला पाहिजे.

शालू: ठेवलाच आहे की तुम्ही. नाहीतर मुलांना मामाचा किती लळा असतो खरं तर!

यशवंता: काही नको. तो लळा लागता लागता मामासाहेबांच्या नको त्या कळा शिकायचा. त्याला खूप शिकवायचं, मोठं करायचं. इंजिनियर डॉक्टर असा काहीतरी झाला पाहिजे.

शालू: अहो सोपं आहे का ते? त्याला खर्च काय कमी येतो का?

यशवंता: अग बघू. काही तरी मार्ग निघेलच.

शालू: म्हणजे पुन्हा कर्ज काढायचं अन् पुन्हा एकदा या पिढीचं कर्ज पुढच्या पिढीला फेडायला लावायचं असंच ना?

a

यशवंता: तू किनई अगदी एवढं निराश होऊ नकोस. काही तरी मार्ग काढूयाच आपण.

शालू: कसला आलाय मार्ग. एखादी लॉटरी लागली तरच निघेल मार्ग. आयुष्य भर कष्ट उपसत बसायचं. माझं तरुणपण गेलं सगळं आजारात आणि त्यापायी हा कर्जाचा बोजा डोक्यावर आला. सगळी हौसेची वर्षं मेली अंथरुणातच गेली. आता बरं वाटायला लागलं तर वय गेलं, ताकदही राह्यली नाहीय्. कुणाची दुपटी शीव, झबली शीव, पापड कर असं काय काय करत चार पैसे जोडायचे अन् संसाराला हातभार लावायचा. गेल्या दहा वर्षांत कुठं चार दिवस परगावी गेल्याचं आठवत नाही. पुण्याकडे दोन दिवस जाऊन राह्यलेवते त्याला सुद्धा किती तरी वर्षं झाली असतील. रोहितच्या जन्माच्या आधी! आमचं कर्मच मेलं दरिद्री! (रडू लागते)

यशवंता: अग रडत्येस काय रात्रीच्या वेळेस? आणि रडून तरी काय होणाराय्. त्याला कंबर कसून सामनाच केला पाहिजे.

(शालूला जवळ घेऊन, पाठीवरून हात फिरवून शांत करण्याचा प्रयत्न करतो.)

शालू: (स्फुंदत पण उसळून) तुम्ही नुसते बोला. बोलण्यानं काय होणाराय्? तुम्ही मला विचारता ना की रडून काय होणाराय् ते. मी तुम्हाला विचारते नुसतं बोलून तरी काय होणाराय्? ते तरी सांगा.

यशवंता: (शालूला जवळ घेऊन शांत करीत) अग असा त्रागा करून कसा चालेल? माणसानं आशावादीच राह्यला पाहिजे. संध्याकाळी पंडितरावांनी सुद्धा मला असाच धीर दिला ना? अन् मी सुद्धा जर

a

असाच कावून गेलो तर कसं व्हायचं? तू मला आणि मी तुला असाच एकमेकांना धीर दिला पाहिजे. आपण दोघंही एकमेकांचे जीवनसोबती आहोत हे विसरलीस काय? तुझ्याकडे बघूनच तर मला पुढील आयुष्याबद्दल खात्री वाटते. अग, हेही दिवस जातील.

शालू: तुम्ही असे काही बोललात ना की केवढं बरं वाटतं. नुसत्या आशेनं सुद्धा माणसात कितीतरी बदल होऊ शकतो. पण खरंच का हो बदलेल हे सगळं?

यशवंता: झाली का पुन्हा सुरुवात? आता तुला की नाही एखाद्या ज्योतिषानं सांगितलं ना तरच तुझा विश्वास बसेल.

शालू: कळतं बरं का मला सगळं तुमचं बोलणं! तुमचा नसला तरी माझा विश्वास आहे ज्योतिषावर. काय वाटेल ते म्हणा—वेडी म्हणा, खुळचट म्हणा. पण माझा आहे पक्का विश्वास!

यशवंता: (उठून खिडकीकडे जातो. वाटेत क्षणभर मनीप्लँटकडे एक कटाक्ष टाकतो. खिडकीतून दूरवर पाहत बोलतो) ज्योतिष-बितिष मरू दे. पण शालू, माझं मन मला सांगतंय् की येत्या वर्षभरात सगळं बदलेल. परिस्थिती खूप पालटेल. (शालू त्याच्या मागोमाग खिडकी जवळ जाऊन यशवंताच्या मागे उभी राहते. त्याच्या खांद्यावर हात ठेवते) एक वेगळाच उत्साह माझ्या अंगात संचारलाय्. मी वेगळंच काही तरी करीन. दिवसाची रात्र अन् रात्रीचा दिवस करीन. पण नक्की आत्ता जे चाललंय ना ते बदलणार! उद्याच पंडितरावांच्याकडे जाऊन त्यांचा सल्ला घेतला पाहिजे.

शालू: बाबू पण म्हणत होता की...

यशवंता: हे बघ, मी काहीतरी करणाराय् म्हणजे—बाबूबरोबर वगैरे नव्हे. शक्यतो स्वतंत्रपणे. पण बाबूबरोबर नक्कीच नाही.

शालू: बरं ते नंतर बघू. बाबूनं प्रामाणिक हेतू सिद्ध केला ना की झक्कत घ्याल मदतीला. आता वाईट दिवस आले आहेत ना बिचाऱ्याला. कोण विचारतंय् त्याला?

यशवंता: बस बस. पुरे कर ते बाबूपुराण. आहे तो मूड घालवू नकोस.

शालू: अहो चला झोपायला आता. बारा वाजून गेलेत. सकाळी नेहमीप्रमाणे लवकर उठून रोजच्या रहाटगाडग्याला सुरुवात केली पाहिजे. चला ना. (यशवंताला ओढून कॉटकडे नेऊ लागते.)

यशवंता: अग हो—हो पण! रोहित उठेल ना तुझ्या या दंगामस्तीमुळे.

शालू: काही नाही उठायचा. किती शांत झोपलाय! (रोहितजवळ जाऊन त्याचा मुका घेते) झोप—झोप माझ्या सोन्या राजा. सगळं सगळं किनई छान होणाराय्. तुला खूप खूप आराम मिळेल. बरं का!

(शालू जमिनीवरच टाकलेल्या अंथरुणावर पडते. यशवंता स्वैपाकघरात जाऊन बाहेर येतो आणि प्रकाश हळूहळू मंद होत अंधार होता होता शालूशेजारी अंथरुणावर पडतो.)

## प्रवेश ३

(पुन्हा रंगमंचावर प्रकाश. दुपारची वेळ दाखविणारे वातावरण, रंगमंचावर कोणी नाही. डावीकडच्या दरवाज्यातून शालू येते अन् पर्स टाकून मटकन् कॉटवर बसते.)

शालू: (स्वत:शीच) हुश्श! (कपाळावरचा घाम रुमालानं टिपते) बाई ग! खरंच दगदग नाही सोसत! असली नाजुक तब्येत घेऊन कसंबसं जगण्यापेक्षा मेलेलं बरं. नाहीतरी कुठं जीवनात मोठं सुख आहे? पण बसून चालणार नाहीयू. विमलाबाईंच्या सुनेच्या बाळासाठी कायकाय कपडे करायचेत ते बघितलं पाहिजे! नंतर रोहित आणि हे येतीलच तोपर्यंत चहा अन् काहीतरी खायला पण तयार ठेवलंच पाहिजे. (उठते आणि स्वयंपाकघरात जाण्यापूर्वी दारात कुणालातरी पाहिल्यावर थबकते.) कोण पाहिजे तुम्हाला?

दीपा: (दबकत आणि गांगरून जाऊन प्रवेश करते) नाही, म्हणजे मला—मला जीवन—जीवनना भेटायचं होतं.

शालू: जीवन म्हणजे माझा भाऊ. बाबू म्हणतो आम्ही त्याला. काय काम आहे तुमचं? तुम्ही कोण?

दीपा: नाही म्हणजे—माझं नाव दीपा. घनश्याम शेठजी आहेत ना? मी त्यांची मुलगी.

a

शालू: अच्छा, अच्छा. घनश्यामशेठ! खूप प्रसिद्ध आहेत ते गावात. पेपरात देखील मधून मधून नाव येत असतं त्यांचं! (आराम खुर्ची कडे बोट दाखवून) बसा ना.

(दीपा घुटमळते)

शालू: अहो बसा ना!

दीपा: (बसते) मला अहो नका ना म्हणू. आमच्याकडे आमचे नोकर फक्त मला अहो म्हणतात.

शालू: काय काम होतं तुमचं बाबूकडे? मी निरोप देऊ शकेन त्याला.

दीपा: घरी जाऊन आले मी त्यांच्या. तिथं नव्हते ते. घरी एक म्हाताऱ्या बाई होत्या. ऐकू सुद्धा येत नव्हतं धड त्यांना. अर्ध्या तासानं कळलं त्यांना की जीवनना शोधत्ये मी म्हणून!

शालू: आई आहे ती आमची. मी तिला हल्ली ऐकू येत नाही नीटसं. दिसतही नाही फारसं!

दीपा: त्यांनी सांगितलं की कदाचित् इकडं असतील. म्हणून आले इकडं.

शालू: ठीक आहे. पण बाबू काल आला होता. आज अजून तरी आला नाहीये. आला की निरोप देईन. काय निरोप आहे?

दीपा: त्यांना जॉब पाहिजे ना? आमच्या घनश्याम अँड कंपनीमध्ये एक व्हेकन्सी आहे.

शालू: पण... हे सांगायला तुम्ही स्वत: कशा काय आलात?

a

दीपा: त्याचं असं आहे की आमच्या ऑफिसात जीवन एक दोनदा येऊन गेले होते. त्यांच्या बोलण्यातून कळलं की ते नोकरी शोधतायत म्हणून.

शालू: म्हणजे अर्ज करायला आला होता बाबू की काय? (चेहऱ्यावरती आनंद—औत्सुक्य)

दीपा: नाही, नाही. तसं नाही ते आले होते असे सहजच... नाही म्हणजे...

शालू: सहजच? मला नाही समजलं!

दीपा: अहो, डॅडींच्या ऑफिसात—म्हणजे घनश्याम अँड कंपनीमध्ये एक मुलगी आहे. तिच्याकडे...

शालू: कोण रश्मी का?

दीपा: (खाली मान घालून) होय.

शालू: मोठी गोड आहे पोरगी.

दीपा: (एकदम कावून) कसली गोड आल्येय् डोंबलाची. तुम्हाला नीट माहीत नाही काही.

शालू: म्हणजे?

दीपा: कुणाची तरी ओळख सांगून डॅडींच्या अगदी हातापाया पडून नोकरी मिळवल्येय् तिनं. अन् डॅडींचे मॅनेजर आहेत ना? सारखं त्यांच्या पुढे पुढे करत असते. त्यांच्या केबिनमध्ये—जाऊ दे—आपल्याला काय करायचंय्? पण तुम्ही चांगली आहे असं म्हणालात ना म्हणून वाटलं की खरं ते सांगावं.

a

शालू: बरं, बरं. सांगेन मी बाबूला. पण त्याच्या डोक्यात बिझिनेसचं खूळ इतकं रुजलंय की तो माझं ऐकेलसं वाटत नाही.

दीपा: एवढंच ना—मला वाटतं मी त्यांना पटवू शकेन. अहो नोकरीमधून थोडातरी अनुभव घेतल्याशिवाय धंदा कसा करता येईल? असं समजावून सांगितलं की पटेल त्यांना.

शालू: ते सगळं खरं पण मला एक कळत नाहीये की तुम्ही—सॉरी—तू हे सगळं त्याच्यासाठी का करत्येयस?

दीपा: जीवन शाळेत माझ्याबरोबर होता. खूप पॉप्युलर होता. स्पोर्टस मधे नेहमी नाव असायचं त्याचं. आता जर त्याला नोकरीची जरुरी असेल तर मदत नको का करायला?

शालू: बघ बाई. तुझं ऐकणार असेल तर माझं काय?

दीपा: तुम्ही फक्त त्यांना एक सांगा—त्या रश्मीबरोबर त्याचं बोलणं-चालणं बंद व्हायला हवं. आम्हाला आमच्या कंपनीत चांगले लोक हवेत. जीवन कामावर रुजू झाले की रश्मीला हाकलता येईल.

शालू: तू एवढं सगळं करू शकतेस?

दीपा: हुं. त्यात काय? डॅडी माझं म्हणणं ऐकणार नाहीत असं कधी होणारच नाही. एकुलती एक मुलगी आहे मी त्यांची!

शालू: असं का? मग खरंच किती चांगलं होईल बाबूला नोकरी मिळाली तर! त्याच्या जीवनाला स्थिरता येईल एकदाची. (एकदम दीपाकडे वळून) अग हो, दीपा. तुला चहा-बिहाचं विचारायचं विसरलेच की! घेतेस ना चहा?

a

दीपा: छट्. आता दुपारचा मी चहा-कॉफी घेत नाही. एखादे वेळी कोल्ड्रिंक घेते.

शालू: मग सरबत करू का?

दीपा: (घरातील सामानाकडे एक कटाक्ष टाकून) नका करू काही. मी आता निघतेच. घाईत आहे जरा. एक मात्र लक्षात असू द्या. आमच्या डॅडींचा एकदा एखाद्यावर विश्वास बसला तर पार्टनर सुद्धा करून घेतील. अन् माझा पाठिंबा असेल ना तर दुसऱ्या कुणाला विचारायचे सुद्धा नाहीत! अर्थात् एखाद्याबद्दल जर माझंच मत चांगलं नसेल तर ती व्यक्ती बाहेर जायलाही फारसा वेळ लागायचा नाही हेही तितकंच खरं.

शालू: हं! चांगलाच इन्फ्ल्युअन्स दिसतोय तुझा तुझ्या डॅडींवर. अं?

दीपा: हो, मग आहेच मुळी. मी त्यांची एकुलती एक मुलगी आहे म्हटलं. अन् आई गेल्यापासून तर माझ्याशिवाय त्यांना कुणीच उरलं नाहीय् ना! (एकाएकी घड्याळाकडे पाहते अन् खुर्चीवरून पटकन् उठते) बरं. निघते मी. तेवढा निरोप सांगा जीवनना. विसरू नका हं.

शालू: छे, विसरेन कशी एवढी महत्त्वाची गोष्ट? पण ये पुन्हा सावकाश गप्पा मारायला. (दीपा न उत्तरता बाहेर जाते. शालू खोलीतच इकडे तिकडे घुटमळते—गाणं गुणगुणू लागते. मनी प्लँटकडे जाऊन निरखून पाहू लागते) अरेच्या, याला नवी पालवी फुटणार असं दिसतंय्. बारीक बारीक कोंब आलेले दिसतायत. आता याची नीट निगा राखली पाहिजे. बघू या मनीप्लँट फुलल्यावर खरोखरीच समृद्धीचे दिवस येतायत का ते!

a

(दरवाजा उघडाच असल्यामुळे थोड्या वेळानं बाबू हलकेच आत येतो. शालू मनीप्लँटकडे पाहत उभी असल्यामुळे मागून जाऊन तिचे हलकेच डोळे झाकतो)

शालू: (हात सोडववण्याचा प्रयत्न करते) हे रे काय बाबू, नेहमीची तुझी खोडी? (बाबू हात काढतो आणि शालूच्या समोर उभा राहतो) थोडा आधी आला असतास तर तुझी अन् तिची भेट झाली असती.

बाबू: कुणाची? कोण आलं होतं?

शालू: काय बरं नाव तिनं सांगितलं? हल्ली असं फार विसरायला व्हायला लागलंय बुवा!

बाबू: अग, असं काय करत्येयस. सांग की पटकन्. कोण रश्मी का?

शालू: नाही रे. ती जरा जाडसर आणि सावळी आहे. काय बरं नाव सांगितलं तिनं? (आठवण्याचा प्रयत्न करते) हां, दीपा म्हणाली वाटतं बहुतेक.

बाबू: कोण? घनश्यामशेटजींची दीपा? अन् ती इथं आली होती?

शालू: होय. तीच ती. तुला शोधत शोधत इथपर्यंत आली. घरी जाऊन आली. आईनं तू इथं कदाचित् भेटशील म्हणून सांगितलं, तशी इथं आली.

बाबू: आयला, भारीच आहे बुवा. काय काम होतं तिचं?

शालू: अरे तिच्या वडिलांच्या कंपनीत तुला नोकरी मिळू शकेल असं म्हणत होती. तू रश्मीला भेटायला तिकडे गेला होतास तेव्हा तिला कळलं की तू नोकरीच्या शोधात आहेस म्हणून! तुझ्या शाळेत होती वाटतं. बराच वेळ बोलत बसली होती.

a

बाबू: छया, छया. नोकरी-बिकरी आपण नाही करणार हां. नोकरी गेली खड्ड्यात.

शालू: असं रे काय करतोस? अरे केलीस नोकरी म्हणून काय बिघडतं का? मार्गाला नको का लागायला आता? सत्तावीस वय आहे तुझं. अन् जगात काय सगळे धंदे करणारे आहेत का? नोकरी करणारे आहेतच की एवढे सगळे. अशी काय ईझिली नोकरी मिळते का कुठं? डोक्यात राख घालून बसलं तर कसं होणार?

बाबू: म्हणजे ये रे माझ्या मागल्या! पुन्हा नेहमीसारखंच व्हायचं सगळं. मालकाशी भांडणं, सहकाऱ्यांशी भांडणं! त्यातून तो घनश्यामशेट म्हणजे महाबदमाश, चालू अन् एक नंबरचा खंग्री माणूस आहे. साली हजार लफडी त्याची.

शालू: असू देत. असू देत. तुला नोकरी अन् कामाशी मतलब. आणि त्यातून नोकरी करता करता संधी मिळालीच धंद्याची तर नको कोण म्हणतंय्? अरे हो! ती तर म्हणत होती की तिनं सांगितलं तर तुला पार्टनर सुद्धा करून घेतील तिचे वडील. तिचंच ऐकतात म्हणे तिचे डॅडी.

बाबू: ते काय सांगायला असतंय्. रश्मीबद्दल दीपानं तिच्या डॅडींचे हजार वेळा तरी कान फुंकले असतील. घनश्यामशेट बाकी माणूस कसाही असला तरी त्याला माणसाची पारख बेमालूम आहे. म्हणूनच तर तो रश्मीला काढत नाहीये. रश्मी कामाला फर्स्टक्लास अन् अशी मन लावून काम करणारी माणसं मिळणं आता कर्मकठीण आहे हे त्या घनश्यामशेटलाही चांगलं माहीत आहे.

a

शालू: ते काय वाटेल ते असू दे. माझ्या आग्रहाखातर तरी घनश्यामशेटकडे अर्ज कर. निदान त्यांची गाठ तरी घे. शपथ आहे तुला माझी!

बाबू: हा शपथे-बिपथेचा बावळटपणा आपल्याला बिलकुल पसंत नाही हां— आधीच सांगून ठेवतो. हां, तू म्हणतेच आहेस तर मी दीपाची गाठ घेईन. पण त्या घनश्यामशेटला नाही भेटणार.

शालू: चालेल. काही तरी निष्पन्न होईलच त्यातून.

बाबू: मी सकाळी येऊन गेलो एकदा इथं. तू नव्हतीस. कोणीच नव्हतं.

शालू: बरोबर. हे ऑफिसात होते. रोहित शाळेत गेला अन् मी...

बाबू: हां, बोल ना. बोल. थांबलीस का? कुठं गेली होतीस?

शालू: जाऊ दे रे. गेले होते एका ठिकाणी.

बाबू: हे बघ ताई, उगीच लपवाछपवी करू नकोस. सांग कुठं गेली होतीस ते?

शालू: बरंऽऽ सांगते बाबा, पण कुणाला सांगू नकोस हं. यांना तर अजिबात सांगू नकोस!

बाबू: जसं काही मी सांगतो ते यशवंतराव ऐकून घेतातच आहेत व्यवस्थित! मी कशाला बोंबलायला जातोय् त्यांच्यासमोर.

शालू: तसं नाही रे त्यांना आवडत नाही म्हणून सांगत्येय्. अरे पंडितरावांच्या ओळखीचे ते पानसे आहेत ना? त्यांच्याकडे गेले होते.

बाबू: कोण तो पानश्या ज्योतिषी होय? फेकतो लेकाचा काय वाटेल ते. त्याला काही पण डोंबल कळत नाही.

a

शालू: नाही रे. या वेळेला माझी अन् ह्यांची पत्रिका अगदी व्यवस्थित भिंगातून बघितली की त्यांनी. बराच वेळ अभ्यास चालला होता त्यांचा.

बाबू: असेल, असेल. आपल्याला या लोकांचं सालं काही समजत नाही बुवा!

बाबू: अरे ते म्हणत होते २-३ महिन्यातच भाग्योदय आहे म्हणून. चांगल्यापैकी पैसा मिळेल म्हणत होते. पुढचं काही बोलायलाच तयार नव्हते. सारखं आपलं लवकरच भाग्योदय होणार—पैसा बक्कळ मिळेल एवढंच पालुपद. रोहितबद्दल विचारलं तर ते आपल्याला आत्ताच काही सांगता येणार नाही म्हणाले.

बाबू: अग, लहान आहे तो. त्याचं इतक्यात काय सांगता येणार आहे? अन् त्याची पत्रिका नेली होतीस का?

शालू: नाही. अरे, आमच्याच पत्रिकांच्यावरून विचारलं त्यांना. रोहितची पत्रिका केलीच आहे कुठं अजून? मुंजीसाठी ह्यांना सांगत्ये केव्हापासून करून आणा म्हणून. कुठं आणतायत अजून? नुसतं बघू, बघू म्हणतात आणि काऽऽही करत नाहीत.

बाबू: अगं लहान आहे अजून रोहित.

शालू: अरे काय करतोयस? ह्या ऑक्टोबरला नऊ वर्षांचा होईल तो. अन् चांगला हुशार आहे. आत्ताच त्याच्यावर चांगले संस्कार व्हायला नकोत का? पंडितराव म्हणतात त्याला चांगला शिकवा. हुशार आहे. गेल्या परीक्षेत तो सगळ्या तुकड्यात पहिला आलाय् अन् शिवाय संमेलनातल्या विविध गुणदर्शनात त्याला बक्षीसही मिळालंय्. आता

a

बक्षीस समारंभही व्हायचाय् लवकरच. इतका आनंदात आहे तो विचारू नकोस.

बाबू: तो हुशार आहे, नाव कमवील हे ठीक आहे. पण माझा तुझ्या त्या संस्कार-बिंस्कार याच्यावर फारसा विश्वास नाही. अन् तुमचे ते पंडितराव ना—नावाप्रमाणे पंडित असतीलही कदाचित् पण त्यांचे विचार आपल्याला पटत नाहीत बुवा. अजिबात प्रॅक्टिकल वाटत नाहीत—नुसते पुस्तकी! काय चाटायचंय् त्या ज्ञानाला? (शालू हिरमुसली झालेली बघून) बरं ते जाऊ दे. आणखी काय सांगितलं त्या पानश्यानं?

शालू: आणखीन फारसं काही सांगितलं नाही त्यांनी. फक्त हे नोकरी सोडतील असं म्हणत होते.

बाबू: आयला, खरं झालंच समजा या पानश्याचं तर यशवंतराव माझ्या पार्टनरशिपमध्ये कॉँट्रॅक्टरचा धंदा करणार की काय? आपला तर बुवा विश्वासच बसत नाही. बघू या. देखना पडेगा.

शालू: अरे बाबू, मी तुझ्याशी बोलते नंतर. आधी चहा टाकते आपल्या दोघांसाठी. चांगला मूड आलाय्. (स्वैपाकघरात जाते)

बाबू: (स्वत:शीच) आयला, बायका सगळ्या इकडून तिकडून सारख्याच. तोंडात साला तीळ पण भिजायचा नाही. दीपा मरत्येय् आपल्यावर शाळेपासून अन् खुशाल इकडे येऊन रश्मीबद्दल वेडंवाकडं सांगून जात्येय्. अन् आमची ताई तरी काय! त्या थेरड्या पानश्यानं जे सांगितलं असेल ना ते सगळं माझ्याकडे सांगेल. अर्थात् दुसऱ्याकडून

a

सगळं काढून घेणं ही पण एक कलाच आहे आणि आपल्याशिवाय जमायची नाही इतर कुणाला. (उठून फिरत फिरत मनीप्लँटकडे जातो अन् निरखून पाहतो) सालं सगळं जमून आलं तर काय झकास होईल. थोडं लक पायजे. दीपाला बरोबर लेव्हल करून पदरात आपलं माप पाडून घेतलं पायजे. रश्मी गेली झक मारत. आयुष्यात अशी जीवनशेट बनायची आयती संधी सोडून कोण फुकट चवली-पावलीच्या प्रेमात पडून आपल्या पायावर धोंडा पाडून घेईल? प्लान सगळा व्यवस्थित पार पडला आणि थोडं लक आपल्या बाजूनं असलं ना तर हा जीवन खराखुरा मनी प्लँट—म्हणजे खरा मनी निर्माण करणारा प्लँट—म्हणजे टाकसाळ टाकेल—टाकसाळ!

a

## प्रवेश ४

(यशवंताच्या घरातली पुढची खोली. एकंदरीत सगळं अस्ताव्यस्त पडलंय्. शालू आजारी आहे—अंथरुणावर पांघरूण ओढून पडलेली आहे. शेजारी एका स्टुलावर औषधं, पाण्याचा तांब्या आणि काही रुग्णोपयोगी वस्तू. पालथं टाकलेलं एक पुस्तक. टेबलावर यशवंताचे कामाचे कागद अस्ताव्यस्त पडलेत. एकंदरीत सगळी अवकळा.)

शालू: (कण्हत) अग आई ग! कधी संपणारे हे कंबरेचं दुखणं देवाला माहिती. आधीच काय परिस्थिती आणि त्यात हे दुखणं. दुष्काळात तेरावा महिना आलाय् जणू. (दरवाज्यावर टकटक. शालू उठण्याचा प्रयत्न करते पण वेदना सहन न झाल्यामुळे पुन्हा मटकन् अंथरुणातच पडते) कोण आहे? दार ढकलून आत या. मला उठता येत नाहीये. (दरवाजा किंचित् किलकिला करून रश्मी प्रथम आत डोकावते आणि नंतर हलकेच प्रवेश करते)

रश्मी: (अंथरुणाजवळ जाऊन निरखून पाहते) अग बाई, तुम्हाला बरं नाहीय् असं दिसतंय्. उगीच त्रास द्यायला आले मी.

शालू: अग, नाही ग. असं काही नाही! पाठ अन् कंबर दुखत्येय् म्हणून उठता येत नाही एवढंच. बैस ना.

रश्मी: नाही, जाते मी. पुन्हा येईन कधीतरी!

a

शालू: अग, जाऊ नको. तू आल्येस तर उलट बरं वाटलं मला. बैस ना थोडा वेळ तरी माझ्याशी बोलत. कंटाळा आलाय् अगदी गप्प पडून.

रश्मी: बरं. मग बसते थोडा वेळ. नाही तरी आमचा लंच टाईम संपायला अजून दहा पंधरा मिनिटं अवकाश आहे.

शालू: तू ओळख झाल्यानंतर आमच्याकडे आपण होऊन आलीस याचा अर्थ तुझं काहीतरी काम आहे. बाबूला काही निरोप आहे का?

रश्मी: छे, तसं काही नाही. माझं तुमच्याकडेच थोडं काम होतं. पण तुमची तब्येत...

शालू: काही काळजी नको. माझी औषधं चालूच आहेत. तुला काय बोलायचंय् ते मोकळेपणानं बोल. त्यानंच मला जास्त बरं वाटेल.

रश्मी: बरं आता तुम्ही म्हणताच आहात तर सांगते मला काय सांगायचंय् ते. पण एक विनंती आहे. मी जे काय सांगणार आहे त्याचा तुम्ही अजिबात त्रास करून घेऊ नका.

शालू: ठीक आहे. बोल तू.

रश्मी: मी घनश्याम अँड कंपनीमधे नोकरी करते हे तुम्हाला माहीत आहेच. आमच्या शेटजींची एकुलती एक मुलगी दीपा कुठलीही कपॅसिटी नसताना कंपनीच्या व्यवहारात ढवळाढवळ करीत असते. मागे एकदा आम्ही बऱ्याच एम्प्लॉइजनी मिळून तक्रारही केली होती.

शालू: हां, दीपा. मधे एकदा येऊन गेली होती इथं.

रश्मी: इथं? कशाला ते?

a

शालू: तिचंही एक छोटंसं काम होतं. ते नंतर सांगेन मी तुला. अग आई ग! (कमरेवर हात दाबून हळूच कूस बदलते)

रश्मी: हं तर या या दीपानं आता मलाच कंपनीतून हुसकावून लावायचा चंग बांधलाय् असं मला कळालंय्.

शालू: कशाबद्दल ते?

रश्मी: ते काही मला माहीत नाही. पण तिची माझ्याविरुद्ध कारस्थानं चालू आहेत हे मला पक्कं कळालंय्.

शालू: पण मग या भानगडीत मी काय करू शकते?

रश्मी: जीवनची अन् दीपाची चांगलीच दोस्ती आहे. दीपा तर माझ्यासमोर जीवनबद्दल काय काय बाता मारत असते—मला चिडवण्यासाठी! तर तुम्ही जीवनना विचारून माहिती काढू शकता की हे—हे असं का चाललंय्? निदान मला कळू दे तरी की माझं काय चुकलंय्.

शालू: पण मग तू स्वत: बाबूला का विचारीत नाहीस? तुम्हा दोघांची पण चांगली मैत्री आहे.

रश्मी: आहे का होती तेच कळेनासं झालंय्.

शालू: का?

रश्मी: मी दोन-तीनदा त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी मला चक्क टाळलं. अन् ते नंतर दीपाबरोबर निघून गेले. खरं तर आमचं बरंच काही काही ठरलं होतं!

a

शालू: पण मी हे समजा बाबूला विचारलं तर काय फरक पडणाराय्? मला नाही वाटत काही विशेष होईल असं.

रश्मी: अहो पण मला निदान कारण तरी कळेल की मला का हुसकावून लावतायत ते.

शालू: कारण बाबूला कशाला विचारायला पाहिजे? मी सांगू शकते.

रश्मी: तुम्हाला माहीत आहे? ते कसं?

शालू: तुला मी मघाशीच सांगितलं की दीपा माझ्याकडे येऊन गेली ते!

रश्मी: अच्छा, आय सी. बरीच आहे की ही बया.

शालू: तिच्या मनात तुझ्या जागी बाबूला नेमायचं आहे.

रश्मी: आणि या सगळ्या प्लॅनला जीवनची मान्यता दिसत्येय्. तरीच ते माझ्याशी बोलायचं टाळतायत.

शालू: तुला खरं ते सांगते. आयुष्यामध्ये बाबूला हा पहिला आणि मला वाटतं कदाचित् एकमेव चान्स आलाय्. हे जर सगळं व्यवस्थित पार पडलं तर त्याच्या आयुष्याची गाडी व्यवस्थित रुळावर येईल.

रश्मी: आणि माझ्या आयुष्याचं काय?

शालू: हे बघ, तू तरुण आहेस. ही तुझी दुसरी-तिसरी नोकरी असेल.

रश्मी: तिसरी.

शालू: तुझ्यासारख्या हुशार मुलीला एवढा एक्स्पीरियन्स असताना नवीन नोकरी सहज मिळेल.

a

रश्मी: नवीन नोकरी मिळणं तेवढं सोपं नाही. अन् मी म्हणते कदाचित् मिळेलही. पण हे सगळं कशासाठी? मी कुणाचं काय वाईट केलंय्? शिवाय नुसत्या नोकरीचा प्रश्न नाहीये...

शालू: मी समजू शकते, रश्मी. पण आपल्या आवडत्या माणसाच्या भल्यासाठी कधी कधी मोठा त्याग करावा लागतो.

रश्मी: इथं त्यागाबिगाचा प्रश्नच येत नाही. मला खुलेपणानं विचारलं असतं तर मी कदाचित् हा त्यागही केला असता. पण... (हुंदके आवरीत) पण नकळत असं काही करायचं याला स्वच्छ शब्दात फसवणं असं म्हणतात. मग ऑफिस इन्क्वायरी वगैरेचा फार्स तरी कशाला करायचा? (रडू लागते) मी सरळ राजीनामाच दिला असता. उद्या इन्क्वायरीचा रिझल्ट लागण्याच्या आत मला काही करून राजीनामा दिलाच पाहिजे. नाहीतर मला दुसरी नोकरी मिळणं कठीण होईल. (काही वेळ स्तब्ध शांतता. कोणी बोलत नाही. फक्त रश्मीच्या मुसमुसण्याचा आणि शालूचा कंबरेवर हात ठेवून ''अग आई ग'' असा कण्हण्याचा आवाज. थोड्या वेळानं रश्मी रुमालानं डोळे पुसून उठते.)

रश्मी: निघते मी. पण जाताना एकच सांगते. माझ्या स्पष्ट बोलण्याबद्दल क्षमा करा. विशेषतः तुमच्या अशा परिस्थितीमध्ये खरं तर मी असे बोलायला नकोय् पण माझा नाइलाज आहे कारण मी पुन्हा इथं तुम्हाला कधी भेटू शकेन असं मला वाटत नाही. हा जो काही प्लॅन केला गेला त्यामध्ये तुमचाही सहभाग असलाच पाहिजे. किमान तुमची त्याला मान्यता तरी दिसतेच आहे. भावाच्या भल्यासाठी बहिणीचं प्रेम इतकं आंधळं होऊ शकतं हे मी जाणते. तरी देखील

a

माझ्यासारख्या निरपराध मुलीचा निदान एक स्त्री या नात्यानं तुम्ही विचार करायला पाहिजे होता. माझ्या जीवनाशी खेळण्याचा तुम्हाला काहीएक अधिकार नाही. तरी देखील माझी काही तक्रार नाही. पण स्वार्थापोटी दीपासारख्या मुलीच्या मदतीनं असं कारस्थान रचलं तर या सर्वांचा अंती परिणाम एकच होऊ शकतो हे लक्षात ठेवा. धिस कॅन ओन्ली लीड टु डिझॅस्टर. याचा परिणाम केवळ नाशातच होऊ शकतो. (शालू कंबरेवर हात ठेवून अर्धवट उठून बसण्याचा प्रयत्न करीत रश्मीकडे आ वासून बघत असतानाच पर्स उचलून रश्मी झपाझप दरवाज्यातून बाहेर निघून जाते. रंगमंचावर हळूहळू अंधार. रंगमंचावर पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा मागील प्रवेशाप्रमाणेच रंगव्यवस्था. उगीच इकडे तिकड़े किरकोळ बदल. शालू मागील प्रवेशाप्रमाणेच कॉटवर पडली आहे. उशाशी खुर्ची घेऊन बाबू बसला आहे.)

शालू: शेवटी इतके निरोप पाठवले तेव्हा आज आलास ना बाबू? बहिणीची काही काळजी आहे की नाही तुला?

बाबू: अग, निरोप काल मिळाला पण मधे सतरा भानगडी उपटल्या ना? काय करणार! शिवाय तो वस्ताद घनश्यामशेट अन् त्याची ती बिलंदर पोरगी. शेवटी सगळं व्यवस्थित झालं. व्यवस्थित म्हणजे तुझ्या अपेक्षेप्रमाणे—माझ्या नव्हे.

शालू: म्हणजे नव्या नोकरीवर रुजू झालास ना तू?

बाबू: हो, पण नोकरी म्हणजे माझं काही लायकिंग नाही हे तुला माहित्येय्.

a

शालू: लायकिंग नसे ना का? लायकी आहे ना तुझी? म्हणूनच तुला घेतलंय् त्यांनी. आणि जरा दमानं घेशील की नाही? (अचानक पाठ दाबून धरते) अगाई ग! त्या गोळ्यांचा काही परिणाम होत नाहीये माझ्यावर!

बाबू: ते माझं मरू दे. तुझं कसं काय आहे ते सांग जरा. आता बरं वाटायला लागलं की नाही? डॉक्टर येऊन गेले ना?

शालू: डॉक्टर येऊन गेले की. गोळ्या देऊन गेले पण काऽऽही उपयोग होत नाही बघ. मधूनच जीवघेण्या कळा येतात. सहनच होत नाही.

बाबू: यशवंतरावांनी नाही सुटी घेतली?

शालू: डोंबल! गेल्या सोमवारी जेव्हा पहिल्यांदा दुखायला लागलं ना त्या दिवशी जेमतेम अर्धा दिवस सुटी घेतली. ह्यांच्या बॉसची टूर पण नेमकी तेव्हाच उपटली. म्हणाले, आता सुटी घेतली तर पुढे बॉस त्रास देईल. अजून एक-दोन दिवसात जर ठीक वाटलं नाही तर मात्र काही करून दोन दिवसांची सुटी नक्की घेणार असं म्हणालेत.

बाबू: च्यायला, कठीणच आहे. ताई, खरं म्हटलं तर तुला पंधरा-वीस दिवस पूर्ण विश्रांती अन् चांगली ट्रीटमेंट पाहिजे. मग सगळं ठीक होईल बघ.

शालू: (कावून) आम्हाला का ते कळत नाहीय्? पण अरे परवडतंय् का? कसं तरी करून कामवाल्या बाईकडून स्वैपाक करून घेत्येय् म्हणून चाललंय्.

बाबू: अग मला अजिबात कल्पना नव्हती. एवढं सीरियस आहे असं कळलं असतं ना तर त्या मिळालेल्या नोकरीला पण लाथ मारून आलो असतो. आपल्याला काय? आपण कलंदर माणूस.

a

शालू: कशाला रे बाबू असं बोलतोस. माझं काय? रेटीन कसं तरी. पण तुझं नीट सुरू झालं ना नोकरीचं—त्यात समाधान आहे. बरं ते जाऊ दे. अरे सांगायचं विसरलेच. काल इथं रश्मी येऊन गेली.

बाबू: गेल्या सबंध पंधरवड्यात आपण भाव नाही ना दिला म्हणून आली असेल बोंबलत!

शालू: अरे, तिला शेवटी सगळं सांगणं मला भाग पडलं.

बाबू: (ओरडून) काय? दीपाचा सगळा प्लॅन सांगितलास की काय?

शालू: अरे, असं ओरडू नकोस. मला त्रास होतोय्. मी काय गंमत म्हणून सांगीन काय? ती तशी हुशार आहे.

बाबू: तुम्हा बायकांच्या तोंडात साला तीळ भिजायचा नाही. स्वत:चं पोट बिघडलं असलं ना तरी गावभर बोंबलत फिराल. जाऊ दे. च्यायला, शेवटी केव्हा तरी कळणारच होतं. एका परीनं बरंच झालं. एक घाव न् दोन तुकडे. नंतर कोण नाटकं करत बसणार?

शालू: पण एक रुखरुख मात्र सारखी लागून राहिल्येय् रे!

बाबू: हे काय झेंगट आहे? कसली रुखरुख?

शालू: रश्मी म्हणत होती हे तुम्ही केलंत ते बरं केलं नाहीत. याचा शेवट वाईट होईल एवढं लक्षात ठेवा.

बाबू: उगीच आणखी बावळटपणा नकोय् हं! काऽऽही होत नाही. कावळ्याच्या शापानं गाय मरत नसते!

a

शालू: अरे पण मनात सारखं काहीतरी बोचत राहतं ना—की आपण केलं ते चांगलं केलं नाही.

बाबू: मरू दे. च्यायला, किती खोलवर विचार करतेस अननेसेसरिली. असं कुणी काही म्हटलेलं खरं ठरत असतं तर मी एव्हाना पन्नास कारखान्यांचा मालक झालो असतो.

शालू: बरं जाऊ दे अशा विषयावर जास्त विचार करण्यात अर्थ नाही. झालं गेलं विसरून जावं हेच खरं. पण बाबू, तुला मी बोलावलंवतं ते दुसऱ्याच एका कारणासाठी!

बाबू: काय ते?

शालू: अरे, आज दुपारी अजून जवळ जवळ अर्ध्या तासानं रोहितच्या शाळेत बक्षीस समारंभ आहे. ह्यांच्या सुटीचं त्रांगडं तुला सांगितलंच. माझी परिस्थिती ही अशी! आम्ही आमच्या एकुलत्या एक मुलाच्या बक्षीस समारंभाला जाऊ शकत नाही हे आमचंच दुर्दैव! दुसरं काय? पण आमच्याबद्दल निदान तू तरी जाऊन ये असं मला सुचवायचं होतं.

बाबू: प्रोग्राम काय आहे?

शालू: टेबलावर ती लाल जुनी डायरी आहे ना तीत निमंत्रण पत्रिका ठेवली आहे. बघ. सगळा तपशील दिला आहे. (बाबू टेबलापाशी जाऊन लाल डायरीतून निमंत्रणपत्रिका काढून वाचू लागतो)

बाबू: दुपारी ३ ते ४! ठीक आहे. जमेल मला कारण गावात मला त्या सुमारास कामासाठी यावं लागणारच आहे. पण हे काय? शेटजी स्वतःच अध्यक्ष आहेत. हां तरीच सकाळी मला म्हणत होते की दुपारी शाळेत जायचंय् अन् ते ऑफिसात नसणारेत म्हणून.

शालू: मग जाऊन येतोस का बाबू? अन् हे बघ. येताना त्या अभिनव पुस्तक भांडारातून त्याच्या आवडीचं एखादं पुस्तक माझ्यातर्फे घेऊन दे त्याला. म्हणावं आई येऊ शकत नसल्यामुळे मुद्दाम तुला पाठवलंय् अन् हे पुस्तक पण माझ्यातर्फे त्याला बक्षीस म्हणून दिलंय्. टेबलाच्या वरच्या ड्रॉवरमधून माझी पर्स काढ. त्याच्यात पैसे असतील बघ!

बाबू: पुस्तक अगदी अवश्य आणीन त्याला. पण पैसे बियसे नकोत हं काही. माझ्याकडे आहेत तेवढे. शेटजींनी ॲडव्हान्स पगार दिलाय्.

शालू: असं रे काय करतोस रे बाबू? काही काही वेळा अजिबात ऐकत नाहीस हं!

बाबू: वा ग वा, ताई. मामा म्हणून माझा काहीच हक्क—किंवा कर्तव्यही म्हण फार तर—नाही वाटतं? ते काही नाही. पुस्तक मीच घेणार. सांगताना मात्र आपण दोघांनी मिळून घेतलं म्हणून सांगीन. मग तर झालं?

शालू: बरं बाबा! तू म्हणशील ते खरं. पण आता जा लवकर. नाहीतर उशीर होईल. आणि हे बघ समारंभ संपला ना की त्याला घेऊन तडक इकडेच ये. फार वेळ वाट पाहायला लावू नकोस माझ्या राजाची!

बाबू: अग, पण वाटेत त्याच्या आवडीचं पुस्तक घ्यायचंय् ना? मग तडक इकडे कसं येता येईल?

शालू: तेच ते. अरे पुस्तक घेऊन झाल्यावर तरी तडक इकडे येशील का नाही? बरं. जा, नीघ आता.

बाबू: अच्छा! आराम कर हं आता. म्हणजे लवकर बरी होशील.

(बाबू दरवाज्यातून बाहेर जात असताना रंगमंचावर हळूहळू अंधार होत जातो.)

a

## प्रवेश ५

(रंगमंचावर पुन्हा प्रकाश पण या वेळेस मंद, पिवळट. दु:खी वातावरण सुचवणारा. सायंकाळचा ७.३०-८ चा सुमार. मागील प्रवेशातील शालूची कॉट असलेलीच खोली. शालू अजून पडलेलीच आहे. पण तिला झोप लागलेली आहे. बाबू पुन्हा प्रवेश करतो पण दरवाज्यातच उभा आहे. त्याची दरवाज्यावरची छाया (sillhouette) सुद्धा खिन्नता (melancholy) सुचविणारी. बराच वेळ बाबू दरवाज्यात निस्तब्ध उभा आहे.)

बाबू: (अतिशय हलक्या आवाजात) ताई! (शालूला झोप लागलेली असल्यामुळे उत्तर नाही)

बाबू: (पुन्हा हलक्या आवाजात) ताई...

शालू: (कण्हत) कोण? बाबू? अरे असा दरवाज्यात का उभा आहेस? आत ये की आणि एकटाच कसा आलास? रोहितला घेऊन ये म्हणून म्हटलं होतं ना? अन् इतका उशीर का झाला रे?

बाबू: ताई...

शालू: अरे ताई - ताई काय लावलंयस? बोलत का नाहीयस?

बाबू: अग ताई, कसं सांगू मी तुला?

शालू: अरे, काय झालंय् ते तरी सांगशील की नाही? नुसतं ताई ताई काय करतोयस?

a

बाबू: ताई, फार वाईट बातमी तुला सांगायचं माझ्या नशिबी आलंय्! (एकाएकी बाबूच्या भावनांचा बांध फुटून तो हुंदके देऊ लागतो)

शालू: (डोळे विस्फारून एकटक पाहत) काय वाईट बातमी? रोहित ठीक आहे ना?

बाबू: नाही ग ताई! (हुंदके देत देत एकदम कॉटवर येऊन बसतो आणि तिच्या खांद्यांना धरतो) रोहितला—रोहितला अॅक्-अॅक्सिडेंट झालाय्...

शालू: (अनिमिष नजरेनं एकटक पाहत) बाबू—बाबू, रोहित ठीक आहे ना? बोलत का नाहीयेस तू, बाबू?

बाबू: (मान खाली घालून हुंदके देत) ताई—ताई, समारंभ संपल्यानंतर रोहित मित्रांच्या बरोबर बाहेर येत होता शाळेच्या आवारातून. मी मागून येत होतो—अगदी त्याच्या मागोमाग. तेवढ्यात शेटजींची गाडी वेगानं बाहेर निघाली अन् गर्दीमधे ताबा सुटून रोहितच्या अंगावरच आली. बाकी मुलांना काही फारसं लागलं नाही. पण... पण...

शालू: (ओरडून—अर्धवट रडत) अरे पण, पण काय?

(बाबू काहीच बोलत नाही)

शालू: (अजीजीच्या सुरात) बाबू, बाबू, माझ्या राजाला लागलं का रे फार? अरे सांग की... तू असाच गप्प राहिलास तर वेडी होईन मी.

बाबू: (अगदी हळू अस्पष्ट स्वरात पुटपुटत) त्याला—त्याला म-मग आम्ही हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. य-यशवंतरावांनाही तिथं बोलावून घेतलं. तुला पण खरं तर तिकडंच न्यायला आलोय् मी. पण तुझी तब्येत ही अशी.

a

शालू: (रागावून) अरे बाबू असं काय करतोयस रे? माझा राजा ठीक होईल ना—सांग ना. का लपवतोयस?

बाबू: (पुन्हा अतिशय दबक्या स्वरात) ताई, त्याची परिस्थिती खरोखरीच गंभीर आहे. सीरियस आहे तो ताई...

शालू: (मुसमुसत) खरं सांगतोयस ना रे तू? शपथ आहे तुला माझी!

बाबू: आता तुला कसं सांगू ताई. खरं सांगायचं तर—तर तो तुला आता कधीच भेटू शकणार नाही.

शालू: (जोराने हंबरडा फोडून) अरे देवा, तू हे काय केलंस? मी काय कुणाचं वाईट केलं होतं रे? तो तर निष्पाप होता माझा राजा. आता काय करू मी म्हणजे तो मला भेटेल? बाबू... बाबू... (बाबूच्या गळ्यात पडून) हे सगळं असं कसं झालं रे? अरे देवा, माझं एकुलतं एक लेकरू का असं हिरावून नेलंस? हे सगळं खोटं आहे. (बरळू लागते) तुम्ही सगळे खोटारडे आहात. असं काहीच झालेलं नाहीय्. माझा राजा ठीक असणाराय्. सकाळीच मला टाटा करून गेलाय् तो. बक्षीस दाखवायला येईलच आता तो. विचारीन की मी त्याला—एवढा उशीर का केलास म्हणून. किती वाट पाहायला लावतोस रे? बाबू... बाबू, तुला आणायला सांगितलेलं पुस्तक आणलंयस ना तू? कुठंय् ते? दाखव बघू...

बाबू: (हलक्या स्वरात) ताई, मला धरून धरून तू येऊ शकशील ना रस्त्यापर्यंत? तिथून रिक्षानं जाऊ आपण. त्याला परस्परच न्यायचं ठरलंय्.

a

शालू: (भानावर येऊन. रडत) बाबू, बाबू... हे काय झालं रे? माझ्यात त्राणच राहिलं नाहीय् रे. सगळं संपलंय्. आता काही काऽऽही बाकी उरली नाहीय्.

(बाबूला मिठी मारून शालू ढसढसा रडत असतानाच पडदा पडतो.)

# अंक दुसरा

## प्रवेश १

(स्थळ- यशवंताचं घर. रोहितच्या मृत्यूनंतर जवळ जवळ महिना लोटलेला आहे. घरामध्ये काहीही बदल नाही. फक्त टेबलावर रोहितचा एक मोठा फोटो फ्रेम करून ठेवलेला आहे. फोटोला हारही घातलेला आहे यशवंता, पंडितराव आणि शालू बसलेले आहेत. शालू 'शॉक' मधून बरीचशी रिकव्हर झाली असली तरी डोळे लाल. डोळयांच्या भोवती काळी वर्तुळे तयार झाली आहेत. यशवंताचे डोळेही खोल गेलेले आहेत.)

पंडितराव: हे सगळं इतकं अचानक घडलं. मी गावाला गेलो होतो. आल्यावर मला कळलं अन् तडक इकडे आलो. मी तरी तुमचं काय सांत्वन करणार? झालंय् ते इतकं विचित्र आहे की परमेश्वरानं तरी असं इतकं दुष्टपणानं का वागावं हेच समजत नाही. जन्म-मृत्यूचं रहाटगाडगं आहे ते काही खोटं नाहीय्.

*जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।*
*तस्मादपरिहार्येर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥*

पण आम्ही सामान्यांनी ही स्थितप्रज्ञता आणायची तरी कशी? यशवन्ता, मला कल्पना आहे की पुत्रशोकाचं दुःख हे सांत्वनापलीकडचं आहे. हा मी दुबळा तुमचं कोठून सांत्वन करणार?

a

रोहितच्या स्मृतीसाठी म्हणून शाळेत एखादा पुरस्कार त्याच्या नावानं ठेवणं मला वाटतं उचित ठरेल.

यशवंता: पंडितराव, कशातच काही अर्थ नाही. सगळं जीवनच आता शुष्क आणि नीरस वाटायला लागलंय्. आम्ही जगून पुढे काय करणार आहोत तेच उमजत नाहीये. आमचं यापुढचं जगणं म्हणजे वठलेल्या झाडाचं निरर्थक जगणंच नाही तर दुसरं काय? मरण येत नाही म्हणून जगायचं याला काही अर्थ आहे का, पंडितराव?

शालू: मला तर आता जीवच द्यावासा वाटू लागलाय्. माझा राजा मला भेटणार नाही आता कधीही. (डोळे पुसते)

पंडितराव: शालिनी, यशवंता, तुम्हाला शोक आवरावा लागेल. तुमच्या पुढे एक मोठं आव्हान आहे. या आव्हानाला उत्तर देण्यासाठी तुम्हाला शोक आवरून सर्व शक्तीनिशी झुंज द्यावी लागणार आहे. शालिनी, मागे मी तुला सांगितलेलं आठवत असेल कदाचित् की मानवाला ईश्वरानं जे आयुष्य दिलंय् त्याच्यामध्ये खचितच काही तरी हेतू असला पाहिजे. तर हे आव्हान स्वीकारून तुम्हाला कितीही निरर्थक वाटलं तरी लढण्यासाठी जगावं लागणार आहे.

यशवंता: आव्हान? कसलं आव्हान? मी नाही समजलो! शिवाय कुठलंही आव्हान पेलण्याची ताकदही या खांद्यात आता राहिलेली नाहीये! मी आता यापुढं साफ संपलो असं समजा!

पंडितराव: यशवंता, अरे असं म्हणून कुठं चालत असतं का? अरे ही जीवनाची रहाटी चालू ठेवायलाच हवी. आपल्याला जर कौटुंबिक जीवन फारसं

a

उरलं नाही तर समाजाच्या इतर अनेक गरजू घटकांच्या उपयोगी पडलं पाहिजे. एखादा माळी ज्याप्रमाणे फुलझाडांना आपली स्वतःची संतती समजून त्यांची जपणूक करतो त्याप्रमाणे! जीवनाचा एक वेगळा अर्थ यातून नक्की सापडेल. अन् दुसऱ्या एका कारणासाठी सुद्धा तुम्हाला ताकद एकवटून उभं राहावं लागणाराय्.

शालू: (चमकून) कशासाठी? अहो पंडितराव, असं कोड्यात का बोलताय्? कुठलं कारण? कसलं आव्हान? मला काहीच कळत नाहीये.

पंडितराव: आव्हान आहे ते अन्यायाशी झुंज देण्याचं! अन् हा अन्याय जगाच्या समोर आणून दोषी व्यक्तीला शासन होणं हे एकच कारण तुमच्यासमोर असायला पाहिजे.

यशवंता: कोण? कुणाला?

शालू: पंडितराव बरोबर बोलतायत. त्या हरामखोर शेटजीला शासन व्हायलाच हवं. माझ्या एकुलत्या एक लाडक्या बाळाचं मरण घेऊन आलेला साक्षात् यमदूत आहे तो हलकट! या समोरच्या चौकात सर्वांच्या समक्ष त्याला ठेचून ठार मारला पाहिजे. (पुन्हा मुसमुसू लागते.)

पंडितराव: त्याच्या हलगर्जीपणामुळेच हा गुन्हा घडला आहे. त्याला शिक्षा ही व्हायलाच हवी. तरच रोहितच्या आत्म्याला शांती मिळेल. अरे याच्या क्षणैक चुकीमुळे एक सुंदर फूल उमलण्याआधीच खुडलं गेलं याची जाणीव समाजाला करून दिलीच पाहिजे.

यशवंता: तुम्हाला सगळा तपशील समजलेला दिसतोय्.

a

पंडितराव: होय. मी शाळेतही चौकशी केली. दोघे तिघे शिक्षकही माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. प्रत्यक्ष अपघात पाहिलेले आय विटनेसेस सुद्धा मिळतील. द क्रिमिनल मस्ट बी ब्रॉट टु द बुक!

शालू: मग आता आपण काय करायचं?

पंडितराव: माझ्या एक दोन वकील मित्रांचा पण या बाबतीत मी आधीच सल्ला घेऊन ठेवलाय्.

यशवंता: पंडितराव, अहो किती गोष्टी तुम्ही आपणहून समजून करता हो.

पंडितराव: त्यात काही विशेष नाही. माणूस मोकळा असला ना की या गोष्टी त्याला आपोआप सुचतात.

शालू: मग वकिलांचं काय मत पडलं?

पंडितराव: खरं म्हणजे ही केस कॉग्निझेबल ऑफेन्स म्हणजे दखलपात्र गुन्हा असल्यामुळे पोलिसांनी स्वतःच रजिस्टर करायला पाहिजे. पण घनश्यामशेठ मोठा माणूस असल्यामुळे आणि मुख्य म्हणजे श्रीमंत असल्यामुळे माझी खात्री आहे की अपघात सुचवणारी केस रजिस्टर केली असेल आणि एक दोन शिक्षक, पालक यांचे जबाब घेऊन पंचनामा दाखल केला असेल.

यशवंता: पण पोस्टमॉर्टेम?

पंडितराव: अरे यशवंता—पोस्ट मॉर्टेममधे कुणाच्या हातून काय घडलं याचा पत्ता लागत नाही. अचानक मृत्यू असंच त्यामधे दर्शवलेलं असतं. “अमक्या-अमक्या अवयवावर जबरदस्त आघात झाल्यानं

a

आकस्मिक मृत्यू" असाच शेरा असणार. आणि तुम्ही पाह्यलाय् ना पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट?

शालू: आम्ही पाह्यलाय ना. पण आम्हाला त्यातलं काही कळालं नाही. शिवाय त्यावेळची मनस्थिती वेगळी होती आमची.

पंडितराव: आता मी सांगतो त्याप्रमाणे केलं ना तर त्या गुन्हेगाराला नक्की शासन होऊ शकेल. पण आपण मात्र खंबीर राह्यला पाहिजे. विशेषतः कुठल्याही लोभाला बळी पडता कामा नये. कारण तो शेटजी महाबिलंदर, लफडेबाज अन् भरपूर पैशाचा धनी आहे.

शालू: काय बिशाद त्या घनश्यामशेठची?

यशवंता: हा गुन्हा जर सिद्ध झाला ना तर शेठजीला किती शिक्षा होईल हो?

पंडितरात: आमच्या खरे वकिलांनी सांगितल्या प्रमाणे सेक्शन ३०४ इंडियन पिनल कोडनुसार दोन ते तीन वर्ष सक्तमजुरी आणि शिवाय दंड अशी शिक्षा होऊ शकते.

यशवंता: पण आपल्याला खर्च किती येईल केस चालवायला?

पंडितराव: खरं तर तांत्रिकदृष्ट्या आपल्याला केस चालवायची जरुरीच नाही. कारण ही केस पोलिसांनीच दाखल केली पाहिजे. पण पोलीस कोर्टासमोर केस आणतील ती अपघात सुचविणारी असेल— पंचनामा- साक्षी-पुरावे—हे सगळं त्या हिशोबानंच तयार केलेलं असेल अन् शेठजी फार तर किरकोळ दंड, वॉर्निंग यावर सुटेल.

शालू: मग?

a

पंडितराव: आपल्याला हायकोर्टात 'रिट पिटिशन' किंवा 'मँडॅमस' अर्ज दाखल करून घ्यावा लागेल. त्यामध्ये हायकोर्ट खालच्या कोर्टाला हुकूम देईल की शेठजी या हत्येस जबाबदार आहे—हा अपघात नाही अशा रीतीनं हा खटला चालवा. त्या वेळेस आपण जमविलेले खरे पुरावे अन् साक्षी उपयोगाला येतील अन् शेठजी आत जाईल.

यशवंता: पण या पिटिशन वगैरेला खर्च येणारच ना? किती येईल साधारणपणे?

पंडितराव: तसं नक्की सांगता येणार नाही पण दहा एक हजार येईल असं वाटतंय्.

यशवंता अन् शालू (एकदम): अरे बापरे!

पंडितराव: असे एकदम घाबरून जाऊ नका!

यशवंता: अहो घाबरून जाण्यासारखीच परिस्थिती आहे. कुठून आणायचे दहा हजार रुपये?

पंडितराव: अरे आपण सर्वांना परिस्थिती नीट समजावून सांगितली ना तर वकिलांची फी आणि इतर खर्च बरेच कमी करता येतील आणि... (थोडे थांबतात)

शालू: आणि काय?

पंडितराव: मोटर ॲक्सिडेंट्स ट्रायब्यूनलकडून त्वरित नुकसान भरपाईदाखल काहीतरी रक्कम मिळेलच. म्हणजे काहीतरी करून हा खर्च नक्की आटोक्यात आणता येईल.

यशवंता: किती मिळतील हो या नुकसान भरपाईचे—साधारण अंदाज?

शालू: असं काय हो अगदी हपापल्यासारखं विचारताय्?

यशवंता: अग, तसं नव्हे. म्हणजे आपल्याला साधारणपणे किती उभे करायला लागतील ते पाहतोय!

पंडितराव: ते सांगणं कठीण आहे. ट्रायब्यूनलवर अवलंबून आहे. सहा-सात हजारापासून ते वीस हजारापर्यंत काहीही असू शकेल. मला वाटतं तुम्हाला खर्च फारसा सोसावा लागणार नाही.

यशवंता: ठीक आहे. मग आपण याप्रमाणेच सर्व करू या. (शालू कडे वळून) काय ग?

शालू: अगदी बरोबर! माझ्या लाडक्या लेकराला त्या हरामखोरानं या जगातनं उठवलं! त्याला शिक्षा करण्यासाठी काय वाटेल ते करायला आपण तयार राहिलं पाहिजे. (पुन्हा मुसमुसू लागते.)

पंडितराव: शालिनी शांत हो. आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करू. यशवंता तुला विरंगुळा वाटावा एवढ्याकरता तुझ्यासाठी दोन पुस्तकं घेऊन आलोय्. माझ्या संग्रहातली आहेत. जुनी पुस्तकं आहेत पण भाषा सोपी अन् समजण्यासारखी आहे. वाचून बघ. तुझ्या ज्ञानातही भर पडेल. आणि शिवाय मनालाही विरंगुळा होईल. (पिशवीतून दोन पुस्तके काढतात—जुनाटशी वाटणारी)

यशवंता: (पुस्तके हातात घेत) 'गीतेतील तत्त्वज्ञान' अन् हे दुसरं काय बरं आहे? 'फन विथ वर्डस् अँड नंबर्स'...

पंडितराव: 'गीतेतील तत्त्वज्ञान' या पुस्तकामध्ये तत्वज्ञान थोडंफार सोपं करून सांगितलंय् आणि 'फन विथ वर्डस् अँड नंबर्स'मध्ये कोडी आहेत.

शब्द, आकडे यांच्या गमतीजमती आहेत. वेळ जायला पुस्तक छान आहे.

यशवंता: ठीक आहे प्रयत्न करून पाहतो.

पंडितराव: मी निघतो. चौकशी करून वकिलांना घेऊनच एके दिवशी येईन मी. काय? शालिनी ठीक आहे ना?

शालू: हो, हो.

(पंडितराव जातात. रंगमंचावर अंधार)

## प्रवेश २

(पुन्हा यशवंताचंच घर. यशवंता पंडितरावांनी दिलेली पुस्तकं चाळतोय्. मधूनच आतल्या खोलीत असलेल्या शालूशी बोलतोय. शालूही त्याला आतूनच उत्तरं देत्येय्.)

यशवंता: पंडितरावांनी दिलेलं ‘गीतेतील तत्त्वज्ञान’ हे पुस्तक चांगलं असलं तरी जरा किचकट आहे. पण हे दुसरं पुस्तक फारच छान आहे बुवा. खूप आकड्यांच्या अन् शब्दांच्या गमती दिल्यायत यात. (मध्येच आतल्या खोलीकडे पाहून) अग, ऐकत्येयस ना?

शालू: (आतूनच) होय, होय. ऐकत्येय् ना!

यशवंता: या पुस्तकात हे बघ काय दिलंय्! या प्रकरणाचं नाव आहे P-A-L-I-N-D-R-O-M-E-S (सावकाश स्पेलिंग वाचतो) पॅलिंड्रोम्स. पॅलिंड्रोम म्हणजे उलट-सुलट कसंही वाचलं तरी सारखेच राहणारे शब्द, वाक्यं किंवा संख्या. अग, शाळेत आपल्याला मास्तर अशी वाक्यं किंवा शब्द सांगत नव्हते का? कडक, डालडा असे शब्द किंवा ‘रामाला भाला मारा’ अशी वाक्यं आम्हाला लहानपणी मास्तरांनी सांगितलेली आठवतात. असलीच इंग्लिशमधली वाक्यं त्यांनी दिल्येयत.

शालू: (आतूनच) म्हंजे? इंग्लिशमध्ये पण अशी वाक्यं असतात?

यशवंता: हो अग. दिलीयत ना त्यांनी इथं.

(पंडितराव प्रवेश करतात.)

पंडितराव: काय यशवंता, काय चाललंय्?

यशवंता: काही नाही. तुम्ही दिलेलं पुस्तकच वाचतोय्. आज ऑफिसात जरा उशिरा जाणार आहे—गेले काही दिवस जास्त कामामुळे उशिरापर्यंत काम करत होतो.

पंडितराव: (पुस्तकाचं नाव पाहून) अच्छा, म्हणजे 'फन विथ वर्डस् अँड नंबर्स' होय. कसं काय वाटलं?

यशवंता: छान आहे. यातलंच पॅलिंड्रोम्स बद्दल वाचत होतो. उलटसुलट वाचली तरी वाक्यं तशीच राहतात.

पंडितराव: कुठली वाक्यं दिलीयत त्यांनी?

यशवंता: अं हे काय—हे नेपोलियनचं वचन दिलंय् ‘एबल वॉज आय इअर आय सॉ एल्बा’ उलटीकडून वाचलं तरी तसंच होतं—एबल वॉज आय इयर आय सॉ एल्बा’! दुसरं दिलंय् ‘नेम नो वन मॅन’ उलटं केलं तरी तसंच. तिसरंही छान आहे—‘रेड रम सर इज मर्डर’ उलटं वाचलं तरी ‘रेड रम सर इज मर्डर’ असंच होतं.

पंडितराव: या पॅलिंड्रोम्सची मोठी गंमत आहे!

यशवंता: हो ना. लहानपणी आम्हाला मराठी पॅलिंड्रोम माहीत झाले होते—‘रामाला भाला मारा’, ‘चिमा काय कामाची’ असले काही. पण इंग्लिशमधेही असतात हे मात्र आताच कळलं.

पंडितराव: अरे गणितातही पॅलिंड्रोम फिगर्स असतात. उदाहरणार्थ ३८३, ४६४. पॅलिंड्रोम सगळीकडे असतात. पॅलिंड्रोम हा शब्द एका ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. मूळ ग्रीक शब्द ' पॅलिंड्रोमॉस’ असा

a

आहे अन् त्याचा अर्थ पुन्हा परत येणे coming back again असा होतो. नीट विचार केलास तर असं लक्षात येईल की आयुष्य हे एक पॅलिंड्रोमच आहे. बाळपणी जसा मनुष्य असहाय असतो तसाच तो म्हातारपणीही असहाय बनतो. जन्म कसा होतो हे ज्याप्रमाणे गूढ आहे तसाच मृत्यू हे ही एक गूढच आहे. याखेरीज आपण जेव्हा चांगलं करतो त्याचं फळ आपल्याला शेवटी चांगलंच मिळतं. वाईट केलं तर त्याचा शेवटही वाईटच होतो. असेच अनुभव आयुष्यात अनेकदा येतात. हे सगळे एक प्रकारचे पॅलिंड्रोमच आहेत. मधला भाग कसाही असला तरी सुरुवात अन् हेतू आपल्याला चांगलाच ठेवला पाहिजे. तेव्हाच चांगला पॅलिंड्रोम आपल्याला चांगल्या सिद्धीकडे नेईल. करावं तसं भरावं हाच पॅलिंड्रोमचा गूढ अर्थ आहे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनातल्या पॅलिंड्रोमचाही तोच अर्थ आहे.

यशवंता: (दूरवर पाहत) मला पॅलिंड्रोमचा एक नवा अर्थ समजला. पण शेवटी जे सांगितलंत ना ते खूपच अवघड आहे. खरोखरीच अवघड आहे जीवनातला पॅलिंड्रोम ओळखणं.

पंडितराव: अरे वाईट मार्गानं मिळवलेलं धन पुन्हा वाईट मार्गाकडेच जायला प्रवृत्त करतं त्यातलाच हा प्रकार. तुलाही असे काही अनुभव आले असतीलच—कदाचित् येतीलही. मी त्यांना वाईट पॅलिंड्रोम म्हणतो.

शालू: (स्वयंपाकघरातून बाहेर येत) मी तुमचं सगळं बोलणं ऐकलं! चांगल्या पॅलिंड्रोमचीच जोपासना केली पाहिजे—चांगल्या हेतूनं चांगलं मिळवण्यासाठी.

a

पंडितराव: शालिनी, यशवंता, ते सोपं नाही. आपल्या जीवनाच्या पॅलिंड्रोमला चांगला आकार देणं फार अवघड काम आहे. जणू ती एक परीक्षाच आहे. सद्बुद्धीनं तुम्ही तसं कराल अशी आशा करतो. असो. एक सांगायचं राहिलंच.

यशवंता: आपल्या केसबद्दल का?

पंडितराव: होय! रोहितच्या निधनाची बातमी दै. विशाल महाराष्ट्रमध्ये आली होती. दुसऱ्याच दिवशी. दै. विशाल महाराष्ट्रचा ज्येष्ठ वार्ताहर सुखटणकर रोहितच्या शाळेतल्या समारंभ 'न्यूज कव्हरेज'च्या हेतूनं सगळ्या घडामोडी टिपण्यासाठी तिथे आला होता. त्यानं रोहितची घटना स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली असल्यामुळे तो आपला एक महत्त्वाचा साक्षीदार होऊ शकतो. मी त्याच्याशी बोललो. तो आपल्या बाजूनं व्यवस्थित साक्ष तर देईलच शिवाय शेटजीचे इतर उद्योग, अशाच काही संबंधित घटना पण तो उजेडात आणू शकेल.

शालू: अन् पोलिसांचं काय?

पंडितराव: मला वाटत होतं त्याप्रमाणेच अपघाताचा देखावा करणारा पंचनामा आणि साक्षी-पुरावे पोलिसांनी तयार ठेवले आहेत.

यशवंता: शेटजी काय जामिनावर आहेत काय?

पंडितराव: छे. कसला जामीन अन् कसलं काय. शेटजीला फक्त पोलिसांना सांगितल्याशिवाय गाव सोडून कुठंही जाऊ नये अशी ताकीद दिली आहे. हे म्हणजे 'म्युच्युअल अंडरस्टँडिंग' यातला प्रकार!

यशवंता: पण पंडितराव, शेटजींसारख्या मोठ्या माणसाशी टक्कर घ्यायची म्हणजे...

पंडितराव: होय, मला माहीत आहे. अवघड आहे पण अशक्य नाही. आपण धीर सोडता कामा नये अन् आपल्या तत्त्वाला चिकटून राहिलं पाहिजे. म्हणूनच मी म्हटलं होतं ना की हे एक आव्हान आहे—एक चॅलेंज आहे. वाटतं तितकं हे काम सोपं नाही. ईझिअर सेड दॅन डन्! बोलणं सोपं आहे पण करणं कठीण. असो. तू हे आव्हान पेलशील अशी मला आशा आहे.

यशवंता: नक्कीच!

पंडितराव: मग मी खरे वकिलांशी याबद्दल पुढचं बोलतो. नंतर तुला विचारून त्यांची तुझ्याशी गाठ घालून देतो. चालेल ना?

शालू: इश्श! चालेल ना काय? पंडितराव, तुमच्यामुळे आम्हाला किती धीर येतो. तुम्ही असलात ना पाठीशी की मग कुणाचीही आणि कशाचीही भीती वाटेनाशी होते.

पंडितराव: शालिनी, असं एकमेकांनी एकमेकांना सहाय्य केलंच पाहिजे. नाहीतर 'माणुसकी' हा शब्द नुसता कोशातच राहील! बरं निघतो मी.

शालू: अहो थांबा ना जरा. मी चहा टाकत्येय्.

पंडितराव: ठीक आहे. पण अर्धा कपच हं—अन् आमचा नेहमीसारखा—बिनसाखरेचा!

शालू: हो, हो. पक्कं लक्षात आहे माझ्या.

a

यशवंता: शालू नाही विसरायची असल्या गोष्टी. मीही चहा घेऊन मग ऑफिसला जायला निघतो.

पंडितराव: मला बरं वाटलं तुला पुस्तक आवडलं ते ऐकून.

यशवंता: खरंच अहो, असं कुणीतरी मार्ग दाखवल्याशिवाय आमच्या सारख्याला कुठून पॅलिंड्रोमसारख्या चमत्कारिक गोष्टी कळणार?

पंडितराव: मी कसला आलाय् मार्गदर्शक? माझं काम एखाद्या बॅटरीसारखं आहे.

यशवंता: पण बॅटरी खूप महत्त्वाची आहे. ती नसेल तर अंधारात मनुष्य ठेचकाळल्याशिवाय राहणार नाही.

पंडितराव: हां, हे मात्र खरं. पण आता या बॅटरीमधला मसाला—म्हणजे त्यातले सेल आता क्षीण होत चाललेले आहेत.

यशवंता: छे, छे. तुमच्याकडे पाहून कुणीही असं म्हणू शकणार नाही. (शालू चहा आणते आणि दोघांना देते.)

शालू: आणि हे अमृततुल्य पेय घेतल्यावर काय बिशाद आहे कुणाची बॅटरी क्षीण होण्याची!

(सर्वजण हसतात. चहा पिऊन पंडितराव आणि यशवंता उठतात आणि जातात.)

## प्रवेश ३

(शालू एकटीच कॉटवर पडून पुस्तक वाचत आहे. दारावर टकटक.)

शालू: कोण आहे? (डोकावून पाहत) अरे बाबू, ये ना आत.

बाबू: यशवंतराव बाहेर गेलेले आहेत ना?

शालू: होय. कामावर गेले आहेत.

बाबू: मग ठीक आहे.

शालू: काय ठीक आहे?

बाबू: खरं म्हटलं तर मला तुझ्याशीच बोलायचंय्. यशवंतराव कामावर गेलेले असणार असं वाटतच होतं. खात्री नव्हती इतकंच. मी, माझ्या कल्पना अन् माझे विचार त्यांना फारसे पसंत पडत नाहीत म्हणून मी तुझ्याशीच प्रथम बोलणार आहे.

शालू: काय बोलायचंय् तुला, बाबू?

बाबू: (कॉटवर शालूशेजारी बसत) हे बघ ताई, मी काल रात्री झोपण्याआधी विचार करत पडलो होतो तेव्हा माझ्या डोक्यात आलं की-की-अं...

शालू: अरे, असं रे काय करतोयस? नीट सांग ना काय सांगायचंय् ते.

बाबू: ताई, असं बघ—गेली कित्येक वर्षं मी पाहतोय्. तुम्ही दोघं परिस्थितीशी झगडून झगडून अगदी मेटाकुटीला आलायत. तुझं आजारपण. ऑपरेशन, नणदांची लग्नं झालंच तर...

शालू: अरे, चालायचंच. एखाद्याचं नशीव! काही झालं तरी आपण नशीब बदलू शकतो का?

बाबू: का नाही? ही परिस्थिती अगदीच न बदलता येण्यासारखी नाहीये. इतकी वर्षं तुम्ही दोघांनी खस्ता खाल्ल्यायत्. आता तुम्हाला थोडा आराम अन् सुख मिळालं तर काही हरकत नाही.

शालू: हरकत असण्याचा संबंधच काय? सुख काय असं मागून मिळत असतं? अन् मिळालं तरी आता काय उपयोग? आम्हीच आता पोरके झालो आहोत.

बाबू: असं का म्हणतेस ताई? परिस्थिती बदलेल—काहीतरी नवीन घडेल. मूलबाळ नसलेली कितीतरी जोडपी जगतायत—जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतायत.

शालू: असेलही कदाचित तसं. पंडितरावही असंच काहीसं म्हणत होते.

बाबू: (किंचित् आठ्या पाडून) काय म्हणत होते?

शालू: असंच—जीवनाचा हेतू शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

बाबू: तुम्हा दोघांना जरा सुखाचे, आरामाचे दिवस लाभले ना की तुम्हाला मनातून जे काही कार्य करायचं असेल ते निर्धास्तपणे करता येईल.

शालू: पण सुख, आराम म्हणजे नक्की काय म्हणायचंय् तुला? अन् ते कसं काय मिळणाराय्?

बाबू: कसं मिळवायचं, काय करायचं ते तू सगळं माझ्यावर सोड. आता सुखाचे दिवस म्हणजे सांगायचंच झालं तर यशवंतरावांना एखादी चांगली,

a

भरपूर पगाराची प्रायव्हेट नोकरी मिळाली असं समज. तर तुमची कर्जं वगैरे फिटतील की नाही? डोक्यावरचं ओझं कमी होईल. तुला सुद्धा एक चांगली ट्रीटमेंट घेऊन कायमचं दुखण्यातून मुक्त होता येईल.

शालू: खरं आहे तू म्हणतोयस ते. पण हे कसं होणाराय्? कसं शक्य आहे हे?

बाबू: त्यासाठी... त्यासाठी मनावर धोंडा ठेवून थोडीशी ॲडजस्टमेंट करावी लागेल एवढंच!

शालू: अरे बाबू, असं कोड्यात काय बोलतोयस्. स्पष्ट बोल की. कसली ॲडजस्टमेंट?

बाबू: (सावरून बसतो) स्पष्ट सांगायचं झालं तर—तर रोहितच्या अपघातापासून शेटजी जरा बेचैन झालेयत. नाही, म्हणजे आपण या सगळ्यातून सहीसलामत सुटू याची त्यांना तशी खात्री आहे. पण येत्या निवडणुकीच्या धामधुमीत डोक्याला जरा त्रास कमी झाला तर त्यांना तसं हवंय्. तुम्ही त्यांच्यावर केस घालणार आहात हे त्यांच्या कानावर आलं.

शालू: ते कसं काय बुवा?

बाबू: त्यात काय आहे? त्यांचे इतके काँटॅक्ट आहेत—इतक्या ओळखी आहेत...

शालू: बरं, तरी अजून माझ्या लक्षात येत नाहीय् तुला काय म्हणायचंय ते!

बाबू: त्यांची—म्हणजे शेटजींची अशी कल्पना आहे की जर तुम्ही त्यांच्यावरची केस काढून घेतली तर...

a

शालू: तर—तर काय?

बाबू: तर ते यशवंतरावांसाठी चांगल्या पगाराच्या नोकरीची तरतूद करू शकतील.

शालू: बाबू, बाबू, म्हणजे ह्यांना चांगली नोकरी मिळण्याच्या मोबदल्यात रोहितच्या खुन्याला मोकाट सोडून द्यायचं म्हणतोस? वा रे बाबू— अन् तू हे मला सांगायला आलायस्?

बाबू: हे बघ ताई, गैरसमज करून घेऊ नकोस मी हे जरी तुला सांगायला आलो असलो तरी कल्पना शेटजींची आहे.

शालू: अन् तुला ती मान्य आहे असंच की नाही? बाबू—बाबू, अरे तुझ्या मनात तरी कसं रे आलं असं की त्या रुपड्यांच्या बदल्यात मी माझ्या सोनुल्याच्या मारेकऱ्याला सोडून देईन म्हणून? अरे तू अजून तुझ्या ताईला ओळखलं नाहीस का रे?

बाबू: हे बघ ताई, रोहित जसा तुझा मुलगा होता तसाच माझाही लाडका भाचा होता. यशवंतराव त्याला अन् मला जवळ येऊ देत नव्हते म्हणून आम्ही वारंवार भेटू शकत नव्हतो. यशवंतरावांना रोहितला माझी वाईट संगत लागेल अशी भीती वाटत होती ना!

शालू: मग तुला काय म्हणायचं आहे?

बाबू: मला इतकंच म्हणायचं आहे की रोहितच्या अशा अकाली मृत्युमुळे मलाही तुझ्याएवढंच दुःख झालं. पण म्हणून आपण हे दुःख उगाळीतच आयुष्य घालवायचं का?

a

शालू: (डोळयात पाणी आणून बोलते) तुला आईच्या भावना नाही समजायच्या.

बाबू: नाही समजायच्या कदाचित् पण व्यवहारी जगात अश्रूंची किंमत शून्य असते हे मात्र मला नक्की समजतं.

शालू: अजून त्या प्रसंगाची आठवण आली की की हृदयात चर्रर होतं अन् हळूहळू दुःखाची जागा संतापानं घेतली जाते. अन्यायी माणसाला शासन झालंच पाहिजे असं मनोमन वाटू लागतं. जिवावर धोंडा ठेवून आम्ही हा मार्ग स्वीकारलाय्. त्याला मोठी किंमत मोजावी लागणार आहे याची पण आम्हाला जाणीव आहे अन् त्यासाठी आमची तयारी आहे. पंडितरावांचं आणि आमचं याबाबत एकमत झालं आहे. शिवाय पंडितराव...

बाबू: (मध्येच) ताई, तू पंडितरावांना एकच प्रश्न विचार. प्रश्न कठोर आहे पण डोळे उघडणारा आहे. कुठल्याही मार्गानं तुम्ही गेलात—कितीही किंमत मोजलीत तरी... तरी आता आपला रोहित आपल्याला परत मिळणार नाहीये. उगाच मनाची काहीतरी खोटी समजूत घालण्यात काहीही अर्थ नाही. अगदी अन्याय करणाऱ्याला शासन झालं तरी जे समाधान मिळणाराय् ते सुद्धा चिरंतन नाही—तात्पुरतंच आहे. पुन्हा आपला रोहित या जगात नाही ही जाणीव सतत बोचत राहणारच आहे. मग हे सगळं कशासाठी? आपलीच फसवणूक आपण करून घेण्यासाठी? त्यापेक्षा...

शालू: त्यापेक्षा काय? आरामाचं अन् चैनीचं नवं जीवन सुरू करायचं? अरे आम्हाला त्या सुखाचा घास कधीतरी गोड लागेल का?

a

बाबू: हे बघ ताई, असा विचार करून चालणार नाही. कुणीतरी म्हटलंच आहे—काळ हेच दुःखावरचं एकमेव औषध आहे. कालांतरानं हृदयात खोलवर कुठंतरी जखम नक्कीच राहील. पण वेदना खचितच कमी होतील. मला काही पंडितरावांच्यासारखं तुम्हाला तत्वज्ञान सांगता किंवा शिकवता येणार नाही. पण मी जे सांगतोय् त्याचा तू नीट विचार कर. मला वाटतं तुला त्यात खरोखरीच तथ्य वाटेल.

शालू: मी तुला एवढं सांगते की मी तू सांगितलंयस त्याच्यावर नक्की विचार करीन.

बाबू: ताई, मी तुला अगदी जवळून पाहिलंय्. इतके कष्ट तू उपसलेस—सुख म्हणून तुला काय ते दृष्टीस पडलं नाही—भोगायला मिळालं नाही. तुझ्या वाट्याला आले ते फक्त कष्ट, आजार, वेदना अन् दु:ख! ताई, तुला कधीच वाटलं नाही का की आपण सुखाचा उपभोग घेऊ या म्हणून? तुला चारचौघींसारखी हौस-मौज करावीशी कधीच वाटली नाही का? असं कसं शक्य आहे?

शालू: वाटलं ना. खूप वाटलं. नाही म्हणून खोटं कशाला सांगू? पण त्या मृगजळाचा पाठलाग फक्त स्वप्नातच करायचा कारण जागेपणी ते मृगजळ आहे हे माहीत असतं. स्वप्नात सगळंच खोटं असतं. अन् जागेपणी कुणाला सवड आहे मृगजळामागे धावत राहण्यासाठी! सुख हे फक्त विचार करण्यासाठीच—रंगवण्यासाठीच आहे एवढंच माहीत होतं. ते उपभोगण्यासाठी आहे याच्यावर अजूनसुद्धा विश्वास बसत नाही!

a

बाबू: ते जाऊ दे ताई. पण तू नीट विचार कर अन् मला सांग. जे सुख तुला सावलीप्रमाणे इतकी वर्षं हातात सापडत नाहीये ते तुला आयुष्याच्या इतक्या उशिरा का होईना पण प्रत्यक्ष लाभण्याची संधी मिळालेली आहे! हां, आणि एक लक्षात ठेव. यशवंतरावांशी तू याबाबत चर्चा जरूर कर. पण मी मात्र डायरेक्ट तुझ्याशीच बोलीन. यशवंतरावांशी वाद घालण्याची या प्रसंगी तरी माझी मुळीच इच्छा नाही.

शालू: ठीक आहे.

बाबू: येतो मी.

(जातो. पडदा.)

a

## प्रवेश ४

(स्थळ: यशवंतरावांचा नवीन फ्लॅट - ड्रॉइंग रूम. समोरच खिडकी, त्यातून दूरवरचं एक निऑन साइन दिसतंय्. पाचव्या मजल्यावरचा हा फ्लॅट आहे हे दर्शवणारी ॲल्युमिनियम फ्रेमची खिडकी—तिला ग्रिल नाही. एकूण फर्निचर भारीचं. एका बाजूला एक दिवाण, मध्ये टी-पॉय, दोन-तीन उंची खुर्च्या, भिंतीवर एक पेंटिंग. कोपऱ्यात टेलिफोन. खिडकीपाशी मनी प्लँट—अतिशय फोफावलेलं. रोहितचा मृत्यू होऊन साधारणपणे सहा महिन्यांचा काळ लोटलेला आहे. त्याचा एक फोटो टेबलावर एका फ्रेममध्ये. शालू एका खुर्चीवर मासिक चाळत बसलेली आहे. अंगावर उंची गाऊन. दरवाज्यावर बसवलेली मधुर आवाजाची डोअर चाइम वाजते.)

शालू: (आळोखेपिळोखे देऊन उठत) कोण आलं बाई? हे इतक्या लवकर सहसा येत नाहीत. (जाऊन लॅच उघडते) ओहो! पंडितराव! या, या. बसा.

(पंडितराव कोपऱ्यात काठी ठेवतात. ते आता खूपच थकलेले दिसतायत.)

पंडितराव (दिङ्मूढ होऊन फ्लॅट बराच वेळ न्याहाळतात) शालिनी, हे तुझं नवं घर! विश्वासच बसत नाही. (पुटपुटतात) ऐकलं होतं—

शालू: काय ऐकलं होतं?

a

पंडितराव: की—की तुम्ही जागा बदललीयत म्हणून. काही दिवसांपूर्वी तुमच्या जुन्या बिऱ्हाडाच्या ठिकाणी गेलो होतो. तिथं असं कळलं की तुम्ही इथे राहायला आलायत. साधारण पत्ता सुद्धा कळला होता.

शालू: मग का नाही आलात?

पंडितराव: एक दोन दिवसातच तब्येत खूपच बिघडली. त्यानंतर की आता कुठे बाहेर पडतोय्. वाटलं होतं यशवंता त्या केससाठी...

शालू: पुढचं सगळं इतक भराभर घडत गेलं की तुम्हाला कळवायला वेळच मिळाला नाही. अन् केस वगैरेचा विषय आता संपला.

पंडितराव: (आ वासून) म्हणजेऽऽ? (पुटपुटतात) हां—हे सगळं बघून कल्पना येत्येय् खरी. पण—पण शालिनी, तूच म्हणाली होतीस ना की—की त्या यमदूताला शासन झालंच पाहिजे अन् त्याला ठेचून मारला पाहिजे?

शालू: हो, पण नंतर आमचा विचार बदलला. काही झालं तरी आमचा रोहित काही परत येऊ शकणार नाही. मग काय उगीच स्वतःची फसवणूक करून घेण्यात अर्थ आहे?

पंडितराव: पण मग त्यासाठी—हा, हा कॉँप्रमाईज?

शालू: आता कॉँप्रमाईज म्हणा नाहीतर आणखी काही म्हणा. कशाला हवा तो विचार? जाऊ द्या ना. दुसरं काही तरी बोला. उगीच जुन्या कटु आठवणी कशाला उगाळायच्या?

पंडितराव: (सुस्कारा सोडीत) हं, हं...

a

शालू: आता इतक्यात येतीलच हे. बसा तोपर्यंत. चहा टाकते तुमच्यासाठी— खास तुमचा बिनसाखरेचा!

पंडितराव: नको, नको. चहा-बिहा अजिबात नको. अजिबात इच्छा नाही!

(पंडितराव खुर्चीवर जाऊन बसतात. तेवढ्यात फोन खणखणतो. रिसीव्हर उचलून शालू बोलते)

शालू: (रिसीव्हरमध्ये) हॅलो, हॅलो. नाही ग. मंगळवारी अजिबात वेळ नाहीये ग. दुपारी पार्लरमध्ये जायचंय्. संध्याकाळी डॉ. आगरवालची अपॉइंटमेंट आहे. ओके, ओके. नंतर बघू पुढच्या आठवड्यात कधी तरी. (पंडितराव तोपर्यंत रोहितच्या फोटोपाशी जाऊन उभे राहतात अन् पुटपुटतात.)

पंडितराव: (पुटपुटतात) हे भोग—कसे आहेत रे हे भोग. लांच्छित आहेत— रक्तलांच्छित आहेत. अर्जुना, अरे अगदी तुला वाटलं तसंच माझ्याही मनात येतंय् रे. (थरथरत्या आवाजात श्लोक म्हणतात.)

*गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीहलोके।*
*हत्वार्थकामांस्तु गुरुनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान्॥*

(डोळे पुसतात अन पुन्हा खुर्चीवर जाऊन बसतात.)

शालू: तुम्हाला सांगायचं राहिलंच. माझं पूर्वीचं दुखणं पार पळालंय् आता. डॉ. आगरवाल यांची ट्रीटमेंट चालू आहे. खरं म्हटलं तर ट्रीटमेंट अशी आता फारशी राहिलीच नाहीये. आता फक्त चेक-अपला जावं लागतं मधनं मधनं. डॉ. आगरवाल कित्ती चांगले डॉक्टर आहेत. स्वत: शेटजींचे फॅमिली डॉक्टर आहेत ते!

पंडितराव: शेटजी—शेटजी म्हणजे...

शालू: अहो, घनश्यामशेटजी.

पंडितराव: (चुळबुळत) हं. हं.

शालू: शेटजी आमची खूप काळजी घेतात. त्यांनीच प्रथम डॉ. आगरवालना फोन करून घरी म्हणजे इथं तपासायला पाठवलं.

पंडितराव: (पुटपुटतात) शेटजी यमदूत. यमदूत नाही का!

शालू: काय?

पंडितराव: काही नाही. निघतो आता मी. काही काम नव्हतं माझं. म्हणजे आता तरी राहिलेलं नाही.

शालू: अहो थांबा ना! हे येतीलच आत्ता. (तेवढ्यात पुन्हा डोअर चाइम वाजतो. शालू दार उघडते. यशवंता आत येतो. अंगावर उंची कपडे पॉलिश्ड बूट! बाजूला खुर्चीवर बसलेल्या पंडितरावांकडे त्याचं लक्ष नाही.)

यशवंता: (गाण्याच्या सुरात) ओ, शालूऽऽ शालूऽऽ (एकदम पंडितरावांकडे लक्ष जाऊन चपापतो अन् दोन पावलं मागे जातो) अरे, पंडितराव? कधी आलात?

पंडितराव: झाली दहा-बारा मिनिटं. मूड चांगला दिसतोय्. तुझा नेहमीचा—म्हणजे पूर्वीचा बॉस बदलला वाटतं? बदली झाली की काय त्याची?

यशवंता: (ओशाळतो) पंडितराव, अहो मी—मी आता सरकारी नोकरीत नाही. सोडली मी ती.

a

पंडितराव: छान, छान! बेटर लेट दॅन नेव्हर. कुठे नोकरी करतोस आता? वरची पोझिशन मिळालेली दिसत्येय्.

यशवंता: (नजर देण्याचं टाळीत—खिडकीतून बाहेर पाहत) मी... मी आता घनश्याम अँड को. मध्ये ॲडमिनिस्ट्रेशन मॅनेजर आहे.

पंडितराव: (आ वासून पाहातात आणि कसंबसं पुटपुटतात) अस्सं. छान, छान! (स्वरात काहीसा तिरकसपणा)

शालू: (मध्येच) शेटजींनी ह्यांच्या जुन्या अनुभवाचा विचार करून एकदम वरची जागा आणि चांगलीच पगारवाढ दिली. तसे विचारी आहेत शेटजी.

पंडितराव: *सर्वे गुणा: काञ्चनमाश्रयन्ते।*

यशवंता: (एकदम खालच्या स्वरात आणि पुन्हा खिडकीबाहेरच पाहत) पंडितराव, तुमच्या मनात काय आलं असेल याची मला कल्पना आहे. पण—पण आम्ही नीट विचार केल्यानंतर ठरवलं की जे गेलं आहे ते परत मिळणार नाहीय् पण जे आम्हाला मिळालेलं नाही ते तरी आता मिळण्याची संधी येत असेल तर—

पंडितराव: तर ती सोडायची कशाला? (एकीकडे) ओ लॉर्ड, फर्गिव्ह दोज् फूल्स हू डू नॉट नो व्हॉट दे आर डुइंग!

यशवंता: पंडितराव, जरा आमच्या बाजूनं विचार केलात तर आम्ही केलं ते योग्यच केलं असं तुम्हाला कळून येईल.

पंडितराव: यशवंता, नाही—त्रिवार नाही. कुठल्याही बाजूनं विचार केला तरी तू केलेलं बरोबर आहे असं मला कदापि वाटणार नाही.

a

शालू: ज्यांच्याकडे नाही त्यांना असंच वाटणार!

पंडितराव: शालिनी, मी माझी बाजू कशाला मांडू? मला त्याची अजिबात गरज वाटत नाही. पण तुला माहीत आहे—माझ्याकडे ऐश्वर्य कधीही नव्हतं अन् पुढेही कधी नसणार आहे कारण जे गरजेच्या पलीकडचं आहे ते माझ्या दृष्टीनं शून्य आहे. अन् पैशानं मिळणारी सुखं ही गरज वाटू लागतील एवढं माझं मन कमकुवत नाहीय्. मी आता जातो कारण इथं थांबून काही उपयोग आहे असं मला वाटत नाही...

शालू: ठीक आहे. तुमची मर्जी. पण दोन मिनिटं थांबा. तुमची एक ठेव आमच्याकडे आहे. ती परत घेऊन जा. आमच्या हातूनच दिरंगाई झाली त्याबद्दल माफ करा. (दरवाज्यातून आत जाते. काही क्षणातच दारावरचा चाइम पुन्हा वाजतो. यशवंता दरवाजा उघडतो. बाबू अन् दीपा प्रवेश करतात.)

यशवंता: या जीवनशेट. ये दीपा. बसा, बसा.

बाबू: कसं काय चाललंय्, यशवंतराव? ताई ठीक आहे ना? (कोपऱ्यात बसलेल्या पंडितरावांकडे पाहून) ओ हो. ग्रँड ओल्ड मॅन! हे इकडं कुठं?

यशवंता: सहज आले होते इथं!

बाबू: अस्सं अस्सं! ठीक आहे. ठीक आहे.

दीपा: (खिडकीजवळच्या मनी प्लँटकडे निरखून पाहत) अय्या! मनीप्लँट किती तरारून बाढलंय् नाही?

a

बाबू: डार्लिंग, जसा मनी तसं प्लँट! होय की नाही, यशवंतराव? अन् ताई कुठंय हो?

यशवंता: आत आहे. येत्ये इतक्यातच! (आतून शालूची हाक येते: बाबू, दीपा, बसा हं. आलेच मी.)

बाबू: अहो यशवंतराव, मी तुम्हाला परवाच्या पार्टीचं सांगायला आलोय. शेटजींना यायला नाही जमणार पण काळजी करू नका. आम्ही दोघं नक्की येऊ. बाकी तुम्ही पहिल्या कस्टमर कंपनीला इतक्या झटक्यात घोळात घ्याल असं मलाही वाटलं नव्हतं हं! बरं ते जाऊ दे. परवाच्या पार्टीसाठी 'स्टफ' मात्र जरा कडक हवं हं! उगीच लेचंपेचं काही नको. कसं पाहिजे? सेलर्स ड्रिंक! एकदम कडक! (यशवंता ओशाळून पंडितरावांच्याकडे पाहतो. पंडितराव भावनाशून्य नजरेनं दुसरीकडेच पाहतायत आतून पुन्हा शालूची हाक येते, "अहो जरा आत येता का?" यशवंता अवघड परिस्थितीतून सुटका झाल्याची मुद्रा दर्शवीत आत जातो.)

बाबू: (इकडे तिकडे फिरून पंडितरावांपाशी उभा राहतो) पंडितराव, तुम्हाला इथं बघून जरा आश्चर्य वाटतंय्. तुम्ही इथं सहज आलायत असं वाटत नाही. अं?

पंडितराव: हं! आता इतकं सगळं उघड उघड प्रदर्शन चाललंय् तर मलाही खरं सांगायला इथं संकोच वाटायला नकोय्! लेट मी बेअर द ट्रुथ.

बाबू: बोला बोला!

पंडितराव: मी-मी घनश्यामशेटवर आम्ही जी केस करायचं ठरवलं होतं त्याच्या प्रोग्रेसबद्दल विचारायला आलो होतो.

बाबू: मग कळला प्रोग्रेस? (शेवटच्या शब्दावर जोर देतो.)

पंडितराव: हो कळला ना. सगळं लख्ख दिसतंच आहे.

दीपा: जीवन, जीवन! हे-हे—हाच माणूस डॅडींवर केस घालण्याच्या गोष्टी करत होता का? याला माहीत नाही वाटतं डॅडी कोण आहेत ते?

बाबू: अग दीपा, हो-हो थांब जरा!

दीपा: नाही. मलाच बोलू दे. ए मिस्टर, हे बघा अशा अनेक गोष्टी डॅडींनी 'हूं' म्हणून सोडवल्या आहेत. अर्थात् ही केस मात्र चांगलीच अवघड होती. होती नव्हे—तुम्ही ती अवघड करून ठेवली होती. तुम्ही यशवंतराव अन् ताईंना चांगलंच फितवून ठेवलेलं होतं. डॅडींनी जीवनला माझ्याशी लग्न करायचं असेल तर एक कंडिशन घातली होती.

पंडितराव: कंडिशन? कसली कंडिशन?

बाबू: दीपा-दीपा, कशाला काढत्येयस ते सगळं?

दीपा: जीवन, गप्प बस रे. मला बोलू दे जरा. सोक्षमोक्ष लावते सगळा. हां, यशवंतराव आणि शालूआँटी या दोघांचं केस काढून घेण्याबद्दल मन वळवण्याची कंडिशन! पाहिलंत ना हा तिढा सोडवण्याची माझ्या डॅडींची भन्नाट शक्कल?

पंडितराव: आय सी! ए करप्ट माइंड करप्ट्स एव्हरीथिंग.

दीपा: पण यांच्याबरोबरचा डील भलताच भारी निघाला. सुरुवातीला नुसती जागा किंवा कॅश एवढंच ठरलं होतं. पण यांची डिमांड नंतर बदलली. डॅडी पण जरा ढिलेच! यशवंतरावांना चांगल्या पोझिशनची नोकरी, कॅश अन फ्लॅट एवढं सगळं ठरलं!

बाबू: तेव्हा पंडितराव, बघितलंत ना? तुमचं तत्त्वज्ञान सगळं गुंडाळून ठेवा. व्यवहारी जगात ते काही उपयोगी पडत नाही!

पंडितराव: हं! (सुस्कारा सोडतात) माहीत आहे. ट्रुथ डझंट नेसेसरिली ट्रायंफ! तेही या तुमच्या व्यवहारी जगाचं एक कटु सत्य आहे! परमेश्वराची अशी अवघड परीक्षा घेण्याचीच इच्छा असेल तर त्याला काय करणार? एकच लक्षात ठेवा—यातलं चिरंतन, शाश्वत असं काहीच नाही. आज आहे, उद्या नाही!

बाबू: ओ, डॅम इट्. खूप ऐकलंय्. त्यात नवीन काहीच नाही.

(यशवंता अन् शालू बाहेर येतात. त्यांच्या हातात पुस्तकं आहेत.)

शालू: ही तुमची पुस्तकं आमच्याकडे पडली होती! ती परत देतोय्.

पंडितराव: (पुस्तकांची नावं वाचतात) 'गीतेतील तत्त्वज्ञान' अन् 'फन विथ नंबर्स अँड वर्डस्'. गीतेतल्या तत्त्वज्ञानाचा तुम्हाला आता फारसा उपयोग होईल असं वाटत नाही अन् फन् विथ नंबर्स अँड वर्डस् तुम्ही स्वतःच इतकी करताय् की या पुस्तकाच्या लेखकाला सुद्धा शरम वाटेल! जाऊ दे. मी निघतो. पुन्हा येणं होईलसं वाटत नाही! (कुणालाही अभिवादन न करता अथवा मागं वळून न पाहता तडक पाठ फिरवून चालू लागतात.)

a

बाबू: (शालू अन् यशवंतास) जाऊ द्या! त्यांच्याकडे अजिबात लक्ष देऊ नका. आपण नुसतं ऐकायचं. ऐकावं जनांचं अन् करावं मनाचं हेच खरं!

दीपा: हुं:. समजतात तरी कोण ते आपल्याला? आपण काही केलं तरी लोक नावं ठेवणारच! पण आपण आपला मान राखूनच वागायचं. हाथी चले बजार बजार—कुत्ते भोंके हजार हजार!

बाबू: ते राहू दे! यशवंतराव, मग परवाच्या पार्टीचं नक्की हं. आम्ही येऊ असेच संध्याकाळी. 'स्टफ' आपलं कडक रम असू द्या. अन् ताईसाहेब, जेवायला पण काहीतरी 'खमंग' असू द्या! आता निघतो आम्ही. एक दोन बारीक सारीक कामं आहेत.

शालू व यशवंता: अच्छा, बाय!

(पडदा पडतो)

## प्रवेश ५

(स्थळ: पुन्हा यशवंताचा फ्लॅट. आधीच्या प्रवेशातलीच खोली. चारी खुर्च्या अर्धगोलाकार मांडलेल्या आहेत. ज्या टेबलावर रोहितचा हार घातलेला फोटो आहे त्याच टेबलावर ड्रिंक्सची जय्यत तयारी केलेली आहे. प्रेक्षागृहाकडे तोंड करून डाव्या दोन खुर्च्यांवर दीपा व शालू बसल्या आहेत. अन् उजवीकडच्या दोन खुर्च्यांवर बाबू अन् यशवंता बसलेले आहेत. वेळ साधारणपणे संध्याकाळची—साडेसात आठचा सुमार)

यशवंता: (भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहत) आपण अगदी वेळेवर बसलोय्. म्हणजे आपला कार्यक्रम उरकला की लगेच जेवण! जेवण तयार ना ग? (शालूकडे वळून बोलतात)

शालू: होय - जेवण सगळं तयार आहे. फक्त गरम करून वाढायचं एवढंच!

बाबू: हे बघा यशवंतराव, घाई नको हं. लेट अस एंजॉय! जेवण वगैरे काय असतंच. आपली कामं कशी असतात तुम्हाला माहीतच आहे! ‘कटथ्रोट’. (रमच्या बाटलीकडे बोट दाखवीत) ‘हे’ घेतलं की त्या सगळ्या ‘वरीज्’ खलास! त्यातून हे कडक स्टफ आपलं एकदम आवडतं आहे बुवा! अन् हा ब्रँड—ओल्ड मंक एकदम फर्स्टक्लास! चला, आता आपल्याला तर धीर धरवत नाही. (यशवंता टेबलावरच ड्रिंक बनवतो.)

a

यशवंता: बायकांसाठी खास जिन आणल्येय्. विथ लाइम कॉर्डिअल. दे टू विल एंजॉय! चला घ्या सर्वजण. (सर्व जण ग्लास उंचावून एक घोट घेतात) चीअर्स! चीरिओ.

बाबू: (एक जोरदार घोट घेऊन) आः हा. वंडरफुल नाही का यशवंतराव? गुड ड्रिंक... टू गुड!

यशवंता: ओल्ड मंक आहे. असणारच चांगली. (यशवंताही एक जोरदार घोट घेतो.)

बाबू: ओल्ड मंक. ओल्ड मंक. समहाउ 'ओल्ड मंक' म्हटलं की मला कुणाची आठवण होते माहीत्ये का?

शालू: (जिनचा एक हलकासा घोट घेत) कुणाची?

बाबू: अग, ओल्ड मंक म्हणजे म्हातारा संन्यासी.

शालू: म्हणजे?

बाबू: अग ताई 'म्हणजे' म्हणजे काय? तुमच्याकडे तो म्हातारा येतो ना नेहमी? म्हणजे परवाच आला नव्हता का—तो!

शालू: कोण, पंडितराव? (पंडितरावांचं नाव उच्चारल्यासरशी यशवंता एकदम दचकून पाहू लागतो. पण त्याच्याकडे कुणाचंही लक्ष जात नाही.)

बाबू: हां. करेक्ट - हा तुमचा पंडितराव—दॅट चीट—म्हणजे अगदी खरोखरचा म्हातारा संन्यासीच आहे! बघ ना लेबलकडे. अगदी पंडितरावांचीच प्रतिकृती वाटेल असं चित्र या लेबलवर छापलेलं आहे! वाकलेला—मला वाटतं काठी पण आहे हातात! असा हा संन्यासी म्हणजे मला

a

तुमच्या पंडितरावांचीच साक्षात् आठवण करून देतो. (एक जोरदार घोट घेतो)

शालू: त्यांच्या तत्वज्ञानाचे डोस आम्हाला खूप वेळा मिळालेत. होय की नाही हो?

यशवंता हो. कितीदा तरी. पण त्यांच्या भाषणानं मला खूप वेळा अंतर्मुख व्हायला लावलंय्. (एक जोरदार घोट घेतो)

बाबू: च्यायला, पण एक गोष्ट मात्र खरी हां—की हा थेरडा जे बोलतो ना ते काही काही वेळा आपल्या मनाच्या एका कोपऱ्याला पटत असतं.

दीपा: (जिनचा घोट घेत) काही नाही! हे सगळं मनावर असतं. मला नाही त्यांचं म्हणणं अजिबात पटलं! अन्यायासाठी एवढा झगडा करायची तयारी आहे तर मग संस्थाच का नाही काढत ते एखादी?

बाबू: हां. अन् देत बस म्हणावं अन्यायाविरुद्ध लढा! अन् यशवंतराव, मला वाटतं की प्रत्येक माणसाकडून कधी ना कधी एखादी तरी अन्याय करणारी गोष्ट घडत असेलच की. अगदी पंडितरावही याला अपवाद नसतील. मग त्यांनी स्वत: केलेल्या अन्यायाविरुद्ध पहिल्यांदा लढा द्यावा! हाः हाः हाः! (जोरात हसतो)

यशवंता: मला तर काही काही वेळा कळेनासंच होतं. (पेला उलटा करून संपवून टाकतो)

बाबू: म्हणजे? (शालू आ वासून पाहू लागते)

a

यशवंता: बाबू म्हणाला ते खरंय्. पंडितराव म्हणतात ते काही वेळा इतकं पटतं की आपणच अंतर्मुख होऊन आपलं काही चुकत तर नाहीये ना असं वाटायला लागतं!

बाबू: हे बघा यशवंतराव, असं खोलवर विचार करत कधी बसायचं नसतं. ज्या ज्या क्षणाला जे योग्य बाटेल तसतसा निर्णय घेत जायचं. बाकी कशाचा विचारच करायचा नाही. 'अॅट द स्पर ऑफ द मोमेंट' म्हणतात ना तसं. (पेला रिकामा करतो. यशवंता दोन्ही पेले घेऊन पुन्हा टेबलापाशी जातो आणि ड्रिंक्स बनवू लागतो.)

शालू: अहो, सावकाश अन् बेतानं घ्या बरं का?

बाबू: (हलक्या आवाजात) ताई! घेऊ दे त्यांना हवी तेवढी! जेवण सुद्धा नाही घेतलं तसे चालेल, पण 'हे' घेतल्यामुळे त्यांना काही गोष्टीचा जर विसर पडत असला तर बरंच आहे असं मी म्हणतोय्.

दीपा: (जिनचा एक घोट घेत) होय ना! त्यांना आपलं काही तरी चुकतंय् असं वाटायला लागलं म्हणजे काय डॅडींवर केस घालायला हवी होती की काय?

बाबू: अग तू गप ग जरा. दोन पेग गेले पोटात की विसरतील ते सगळं!

शालू: अरे पण...

बाबू: अरे नाही न् कारे नाही. मी म्हणतोय् ते पटेल तुला.

यशवंता: (ड्रिंक्स बनवून पुन्हा बाबूच्या हातात पेला ठेवतो) खरंच काही काही वेळा आपण करतोय् ते योग्य आहे की नाही हे कळेनासं होतं अन्

a

अनुभवाच्या आणि मॅच्युरिटीच्या दृष्टीनं आपण किती लहान आहोत ते समजायला लागतं.

बाबू: अहो यशवंतराव, कुठलीही गोष्ट आपण कीस काढायला गेलो ना की योग्य का अयोग्य ते समजेनासं होतंच. यावर उत्तम उपाय म्हणजे आपण निर्णय घेतल्यानंतर त्याच्याबद्दल विचारच करायचा नाही.

यशवंता: ते जाऊ दे. पण पंडितराव माणूस अत्यंत हुशार अन् अनुभवी यात शंकाच नाही. म्हणजे जीवनशेट तुम्ही म्हणता तसं 'ओल्ड मंक' इमेजला शोभतीलसे असेच हे पंडितराव आहेत. त्यांनी वाचायला दिलेलं ते एक पुस्तक तर फारच मजेशीर होतं.

बाबू: कुठलं पुस्तक? (एक घोट घेतो.)

शालू: अरे परवा तू आला होतास तेव्हा त्यांना दोन पुस्तकं परत केली ना त्यातलं एक!

यशवंता: (एक लांबलचक घोट घेऊन) 'फन विथ वर्डस् अँड नंबर्स' नावाचं ग्रेट पुस्तक होतं बरं का जीवन. त्यामध्ये 'पॅलिंड्रोम' नावाचा एक गमतीशीर प्रकार होता!

बाबू: (पुन्हा एक घोट घेऊन) पॅलिंड्रोम? ही काय भानगड आहे बुवा?

यशवंता: अरे, पॅलिंड्रोम म्हणजे उलटसुलट कसंही वाचलं तरी सारखेच असणारे आकडे शब्द किंवा वाक्यं. शाळेत नाही का आपण अशी काही वाक्य बोलायचो की—'चिमा काय कामाची' किंवा 'रामाला भाला मारा'. ही वाक्यं उलटसुलट वाचली तरी बदलत नाहीत. तशीच राहतात.

a

बाबू: च्यायला, भारीच आहे की हे पॅलिंड्रोम प्रकरण!

यशवंता: बाबूशेट, इंग्लिशमधली पण काही पॅलिंड्रोम वाक्यं दिल्येयत त्या पुस्तकात.

बाबू: होय का? इंग्लिशमधे पण आहेत का?

यशवंता: (एक घोट घेऊन) आठवतो हं. माझ्या पण लक्षात राहिलंय् की नाही ते बघायला हवं! हं कागद आहे का एखादा जवळपास? (शालूकडे पाहतो.)

शालू: (टेलिफोनजवळचं पॅड आणि पेन आणून देते) हं, हे घ्या.

यशवंता: (आठवल्यासारखं करून कागदावर लिहितो) हां हे एक वाक्य आहे: NAME NO ONE MAN. (बाबूकडे कागद देतो) वाच हे.

बाबू: (कागद घेऊन हळू हळू वाचतो) N-A-M-E N-O O-N-E M-A-N. आयला, खरंच की उलटसुलट वाचलं तरी तेच होतंय् की!

यशवंता: (मद्य किंचित् चढल्यामुळे आवाजात अस्थिरता) हां. पॅ-लिं-ड्रो-म… आहे की नाही गं-गं-मत आणि-आणि

बाबू: आ-णि काऽऽय? (बाबूलाही दारू किंचित् चढली आहे.)

यशवंता: क-काही नाही. अहो जी-जीवनशेट, तर मी क-काय सांगत होतो? हां ते पॅलिंड्रोम. का-काय तर पॅ-लिं-ड्रो-म. ते-ते पंडितराव हां म-म्हंजे आपले ते ओल-ओल्ड-मंक ना त-तर ते तर म-म्हणत होते की-की हे सालं लाइफ म्हणजे पण एक पॅलिंड्रोम आहे. ज-जिथून सुरुवात तिथंच एंड… द-दोन्ही काय आहे त-ते काहीच कळत नाही. भाऽऽरीच आहेत

a

ओ-ओ-ओल्ड मंक. (बरळू लागतो) पॅ-लिं-ड्रो-म. हां, ज-जीवनशेट. संपवा आता. ब-बॉटम अ-अप—खल्लास (पेला रिकामा करतो.)

बाबू: (पेला रिकामा करीत) यशवंतराव, सगळं ठीक आहे ना? नाही म्हणजे आ-आपलं...

यशवंता: हां—आपला—अ-आपलं ठ-ठीक आहे. आता एक ल-लास्ट पेग घ-घ्यायचा हां?

शालू: अहो-अहो राहू दे आता! मी डिनरची तयारी करते.

यशवंता: नाय—नाय. एक ल-लास्ट पेग. काय जी-जीवनराव? ल-लास्ट ईज ब-बेस्ट नाही का? (हेलपांडत टेबलाकडे जाऊ लागतो. शालू उठून मागे जाते. बाबू हातानंच त्यांना अडवू नको अशी सूचना करतो) हां हां प-पॅ-लिम-लिंड्रोम... र-रामाला भाला मा-मारा...

शालू: अहो सांभाळा, नका घेऊ आणखी. त्रास होतोय ना तुम्हाला? (यशवंता थरथरत्या हाताने ड्रिंक ग्लासात ओतत असताना शालू त्याचा हात धरण्याचा प्रयत्न करते. यशवंताचा हात सटकतो आणि ग्लास हिंदकळून टेबलावर पडतो. ड्रिंक टेबलावरच्या रोहितच्या फोटोवर पडते. शालू व यशवंता एकमेकांकडे पाहतात. यशवंताचा चेहरा पांढरा-फटक पडतो. डोळे लाल. सगळीकडे नजर फिरवून अनिमिष नेत्रांनी पाहतो. काही क्षण रंगमंचावर पूर्ण शांतता. स्पॉटलाइट रोहितच्या फोटोवर. Stunned silence. यशवंता तिथल्याच दुसऱ्या ग्लासात ड्रिंक ओततो आणि घटाघटा पिऊन बरळू लागतो.)

a

यशवंता: हाः, हाः, हाः. अरे मी-मी र-रो-हि-त-चा बा-बाप! क-काय पितोय् म-मी. ऐका रे क-काय काय पितोय् मी? हे क-काय आहे ह-हातात? (ग्लासकडे टक लावून पाहतो) हे-हे लाल ड्रिंक काय आहे? (क्षणार्धात त्याचा विकट हसणारा चेहरा भीतीने ग्रासलेला दिसू लागतो) अरे, अरे हे-हे लाल ड्रिंक न-नाहीये. हे त-तर रक्त दिसतंय् म-मला! र-रक्त दिसतंय्. अरे क-किती रे न-नीच पापी क-क-कृतघ्न आहे मी! अरे म-माझ्या लाड-लाडक्या ला-डक्या रोहितचं की र-रे रक्त प-पितोय् मी! (रडू लागतो. शालू त्याला सावरायचा प्रयत्न करते.)

शालू: अरे देवा! काय-काय बोलताय हो हे! अहो सावरा. सावरा स्वतःला...

यशवंता: काही स-सांगू—काही क-काही सांगू नका म-ला-मला का-काही पण ऐक-ऐकायचं नाही. मला तुम्ही फ-फितवून का-काय वा-वा-वाट्टेल त-ते कबूल क-करून घेतलंत. अ-अन् हे मी क-काय करून ब-बसलो रे? अरे (पुन्हा रडू लागतो) अरे, प-पोरा-चं प-पोटच्या पोराचं र-रक्त प्याय-प्यायला ल-लावलंत मला! (उठून मोठमोठ्याने ओक्साबोक्शी रडू लागतो आणि लटपटत, ठेचकाळत, अडखळत रंगमंचावर दिशाहीन चालू लागतो. हलक्या आवाजात स्वतःशीच बडबडू लागतो. क-काय प्यालो रे म-मी? क-काऽऽय प-प्यालो? ज-जीवन-जीवनशेट, हाः हाः हाः. ज-जीवन—जी-व-न! ही ही ही. जीवन? अरे स-साक्षात् मृत्यू आहे-हेस की रे. जीवन-जीवनशेट, काय प्यालो मी? (बाबू काहीच बोलत नाही. त्याच्या डोळ्यात पाहून यशवंता ओरडतो) बाबू, क-काऽऽय प्यालो म-मी? आं-आं, बोल...

बाबू: (भेदरून जाऊन) रम, रम! अहो शुद्धीवर या यशवंतराव!

a

यशवंता: कर-करेक्ट. रम, रम. रऽऽम. र-रेड-रेड र-रम! (गाऊ लागतो) रेड रेड रम्. (मध्येच दचकतो) प-पॅ-लिं-ड्रो-म. हां, प- पॅ-लिं-ड्रो-म. त्या, त-त्या ओ-ओऽऽल्ड मंक—मंक. पंडितरावांनी क-काय सांगितला हो-होता बरं प-पॅलिंड्रोम? (दूरवर पाहतो) हां - हां र-रेड रम सर इज म-मर्डर. गंमतच आ-आहे. (पुढची वाक्यं काळजीपूर्वक उच्चारतो) रेड रम सर इज मर्डर! (ओरडतो) रेड रम सर इज मर्डर. अरे यशवंता... यशवंता ड-डोळे उघड. उलटं सुलटं क-कसंही बघ रे हा प-पॅलिंड्रोम खराच आ-आहे रे—ही रम—ही लाल रम हे-हे रक्तच प-पितोयस् तू यशवंता. हे-हे जे र-रक्त पितोयस् ना तू त-ते तुझ्या ल-लाडक्या रोहित-रोहितचं आ-आहे रे... त-तू खून - मर्डर - म-र्ड-र ख-खूनच केलायस्! (रडतो, पुटपुटतो. शालू व बाबू निष्फळपणे आवरण्याचा प्रयत्न करतात. यशवंता हिसकाहिसकी करून रडत राहतो पण त्यांना हात लावू देत नाही) प-पॅलिंड्रोम—रेड रम स-सर इज म-मर्डर! रेड र-रम सर इज मर्डर! रो-रोहितचा मर्डर - रेड – रम – र-रक्त – ख-खून - खून – रक्त—रोहित... अरे, अरे मागे पंडित-पंडि-पंडितरावांनी रोहितचा प-पण एक अर्थ रक्त-रक्त म्हणून सांग-सांगितला होता की रे क-कृतघ्न यशवंत्या! ख-खराच केलास क-की रे अर्थ. रोहित-रक्त-खून-खून मर्डर - रेड रम - रेड रम... मर्डर... पॅ-लिं-ड्रो-म (कोसळतो)

बाबू: माय गॉड, भलतीच च-चढलीय की य-यशवंतरावांना! पण इतक्यातच? दोन-तीन पेगमधेच?

दीपा: अरे जीवन, उठव त्यांना! जागं कर ना!

a

शालू: अरे बाबू, बघ ना त्यांना. नीट झोपवावं लागेल त्यांना. कसे वेडेवाकडे पडलेत. त्या कोपऱ्यातल्या दिवाणावर उचलून ठेवावं लागेल.

बाबू: (स्वत: किंचित्सा हेलपांडत यशवंताला उचलण्याचा प्रयत्न करतो) बाप रे. चांगलंच वजन झालंय् यशवंतरावांचं. ताई, ये बघू मदतीला.(दोघे यशवंताला उचलून दिवाणवर ठेवतात.)

दीपा: माझा तर आता जेवाय-बिवायचा मूडच नाही. चल रे, जीवन, आत्ताच निघू या!

शालू: अरे बाबू, सगळं ठीक होईल ना रे? तू थांबतोयस् का सोबतीला?

दीपा: नाही हो. उद्या डॅडींनी जीवनला सकाळीच लवकर कामासाठी बोलावलंय्!

बाबू: हो, हो. मी असं-असं करतो की डॉ. अ-आगरवालना फोन करून स-सकाळी येऊन जायला स-सांगतो. बाकी मला का-काही घावरण्यासारखं दिसत नाहीये. जरा-जरा ज-जास्त झाली असेल एवढंच. तू-तू काहीतरी खाऊन झोपून टाक हां. निघतो आम्ही आता. (फोनकडे वळून डायल फिरवू लागतो. पडदा पडतो.)

a

## प्रवेश ६

(स्थळ: यशवंताचा फ्लॅट. मंदसा दिवा. सायंकाळची वेळ. दिवाणवर यशवंता पडलेला आहे. शालू अस्वस्थपणे येरझारा घालते आहे मधूनच यशवंता काही तरी पुटपुटतोय्. शालू 'येतील... येतील' अशा शब्दात समजूत घालीत आहे. शालूचे डोळे खोल गेले आहेत. तिच्या मनाची अस्वस्थता स्पष्ट दिसत आहे. तेवढ्यात डोअर चाइम वाजतो. शालू पटकन् दरवाजा उघडते. पंडितराव आत येतात. कोपऱ्यात काठी टेकून ठेवतात.)

पंडितराव: शालिनी, मला असं एकाएकी का बोलावणं पाठवलंस? अन् यशवंताला काय झालंय्?

शालू: (पंडितरावांना एका बाजूला नेऊन) अहो साधारणपणे आठवड्यापूर्वी फारच घोटाळा झाला! पार्टीमधे यांना खूप चढल्यामुळे हे वाटेल ते बरळू लागले—मी रोहितचा खून केलाय्; ही रम नाही—रक्त आहे... पॅलिंड्रोम; रेड रम सर इज मर्डर वगैरे बोलत कोसळून एकदम बेशुद्ध पडले. आम्हाला पहिल्यांदा वाटलं की जरा जास्त झालीय्. पण बाबूनं फोन करून डॉ. आगरवालना सगळं सांगितल्यावर ते तातडीनं आले. त्यांनी सांगितलं की जोरदार हार्ट अटॅक आलाय म्हणून. यांना लागलीच हॉस्पिटलमध्ये हलवलं. पाच-सहा दिवसांनंतर कंडिशन स्टेबल आहे. म्हणून कालच घरी पाठवलंय्. पण अजिबात हलू द्यायचं नाहीये हो! (स्फुंदू लागते) हे काय झालं हो असं—सगळं ठीक असताना? परमेश्वरानं काय संकटं आणून ठेवल्येत दारात? (रडू लागते) काही कळेनासंच झालंय् हो.

पंडितराव: मग मला एवढं तातडीनं...

शालू: अहो हे सारखं तुम्हाला भेटायचं म्हणून ध्यास धरून बसलेयत. नाही तर जीव देईन म्हणून धमकी देतायत. म्हणून तुम्हाला लागलीच बोलावून घेतलं. ह्यांना तर मधेच जाग येते. मधेच गुंगीत जातात. डॉक्टर म्हणतायत की आत ट्रीटमेंटची जरुरी नाही. आपोआप हळूहळू तब्येत सुधारेल अन् ठीक होईल.

यशवंता: (कण्हत) कोण आलंय् शालू?

पंडितराव: अरे यशवंता, मी पंडित आलोय्. तू ठीक आहेस ना आता? बरं वाटतंय् ना घरी आल्यावर?

यशवंता: (कसनुसं हसून) बरं कसलं आलंय्? हे माझं अखेरचं दुखणं आहे. मी यातून सुटणार नाहीये!

पंडितराव: अरे असं काय करतोयस्. सगळं ठीक होईल.

शालू: सारखं असंच बोलतात अहो. (डोळे पुसते.)

यशवंता: कुणीही उगीच खोटी समजूत करून घेऊ नका. एक तर मी या दुखण्यातून सुटणार नाहीये. अन् सुटलो तरी मला आता जगायची अजिबात इच्छा नाहीय्.

शालू: अहो बोलू नका तुम्ही जास्त. डॉक्टरांनी काही श्रम घ्यायचे नाहीत, फार बोलायचं नाही म्हणून सांगितलंय् ना तुम्हाला?

यशवंता: खूप झाली फसवणूक. आता मला हे शेवटचं तरी बोलू दे. माझ्या मनातली ही जळमटं शेवटच्या घटकेला तरी काढून टाकू देत.

a

पंडितराव, माणूस जन्माला येतो त्यामागे ईश्वराचा काही हेतू असतो असं तुम्ही म्हणालात. आमच्यासारख्या मूर्खांना तो हेतू समजला नाही म्हणून आमचं जीवन व्यर्थ ठरलं! आम्ही वेड्या आशेनं मृगजळाच्या मागे लागलो अन् पाणी हाती लागलं नाही तेव्हा ते मृगजळ आहे हे लक्षात आलं. पण आता उशीर झालाय्—फार उशीर झालाय्. (थांबतो) शालू, जरा पाणी दे! (शालूनं दिलेलं पाणी पितो) पंडितराव, मला तुमच्यापाशी हे कन्फेशन करायचंय् म्हणून तुम्हाला तसदी देऊन बोलावलं. क्षमा करा. तुम्हालाही आम्ही नीट समजून घेतलं नाही. तुमच्याशीही चांगलं वागलो नाही उद्धटपणे बोललो तुमच्याशी... पंडितराव, उद्देशरहित पण वरकरणी सुखाचं दिसणारं जीवन जगण्याचा आम्ही घाट घातला अन् त्यातला फोलपणा आम्हाला अशा रीतीनं प्रायश्चित्त मिळून आता समजतोय्.

शालू: त्यात तुमचा काही दोष नाही हो. मीच मेलीनं ह्यांचं यासाठी मन वळवलं हो, पंडितराव—तुमच्या सल्ल्याच्या विरुद्ध! (रडू लागते.)

यशवंता: पण मीच अखेर निर्णय घेऊन आपल्या जीवनाची वाट विनाशाच्या दिशेला वळवली! पंडितराव, तुम्ही म्हणाला होतात की आयुष्य हा एक पॅलिंड्रोम आहे—असहायतेतून असहायतेकडे नेणारा! ते तर परम सत्य आहे. पण आम्हाला अनुभवायला लागला तो दुःखाकडून दुःखाकडेच नेणारा पॅलिंड्रोम—कारण आमच्या कोत्या बुद्धीला हा पॅलिंड्रोम उलट्या बाजूनं वाचताच आला नाही. आम्हाला वाटलं की हा एकतर्फी सुखाकडे नेणारा मार्ग आहे. तो पॅलिंड्रोम आहे हे आता उलटी दिशा स्पष्ट झाल्यावरच कळलं. परमेश्वर जेव्हा दुःख देतो तेव्हा

त्यातून बाहेर पडून सुखाकडे न वळता समाधान अन् मनःशांती मिळवण्याच्या मार्गाला म्हणजेच चांगल्या पॅलिंड्रोमच्या मार्गाला जायला पाहिजे होतं. तुमचं ऐकायला पाहिजे होतं हे फार उशिरा कळलं! पंडितराव, मला क्षमा करा. शालू, मला क्षमा कर. पण मला गेलंच पाहिजे. मला गेलंच पाहिजे. मला थांबवू नका. हे कटु प्रायश्चित्त मला भोगलंच पाहिजे. पंडितराव, माझ्या नंतर—माझ्यानंतर... (थांबतो. शालू ढसढसा रडू लागते.) शालू, रडू नकोस. जगण्याच्या अनिश्चित अन् दुःखदायी जन्मठेपेपेक्षा मला आता मृत्यूच चिरशांती देणार आहे. मला तो कदाचित् माझ्या लाडक्या पाडसाकडेही नेईल. शालू, रडू नकोस. मला गेलंच पाहिजे. माझ्या मनाची आता पूर्ण तयारी झाली आहे! पंडितराव, माझ्यासारख्या मूर्ख अन् नाठाळ—असमंजस माणसांना मनःशांती मिळवून देण्याचा मार्ग तुम्ही दाखवत राहा. माझं उदाहरण त्यांच्यासमोर ठेवलंत तर नक्कीच ते सत्प्रवृत्ती कडे वळतील. माझ्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करा! (डोळे मिटतो. ॐ शांतिः पुटपुटतो अन् निश्चल होतो. यशवंतावर स्पॉटलाईट.)

शालू: (काही क्षण् स्तब्ध होऊन नंतर कवटाळून हंबरडा फोडते) अहो, हे असं का केलंत हो? मी आता कुणाकडे बघू अन् काय करू? (मोठ्याने रडत रडत) परमेश्वरा, काय साधलंस रे तू? माझ्या चिमुकल्यालाही नेलंस अन् यांनीही हे असं केलं. काय अर्थ राह्यलाय आता त्या जीवनाला? कुठली परीक्षा—कुठलं प्रायश्चित्त घ्यायला लावतोयस रे तू? (यशवंताच्या अंगावर पडून स्फुंदत राहते. स्पॉटलाईट त्या दोघांवरच) काय काय स्वप्नं बघितली होती संसाराची... अन् हे काय होऊन बसलं? नुसती राखरांगोळी झाली. सगळं संपलं... शून्य झालं.

वजाबाकी काहीच राह्यली नाही. आता मी तरी इथं थांबून काय करू? (रडण्याचं थांबवून एकदम स्तब्ध होऊन निश्चयानं वर पाहते. उठून उभी राहते. आजूबाजूला पाहून शेजारच्या खोलीत धावत जाते. पंडितराव आपल्या परीनं तिच्यामागून धावत जाण्याचा प्रयत्न करतात.)

पंडितराव: शालिनी! थांब, थांब. असा आततायीपणा करू नकोस. थांब तू... (आत जातात. स्टेजवर यशवंताच्या मृतदेहाखेरीज कोणीही नाही. मोठ्याने वाद्यसंगीत. प्रकाश मंद होत जातो. काही वेळानं हळू हळू स्टेजवर पूर्वीप्रमाणे पूर्ण प्रकाश. पंडितराव धीमेपणाने खोलीत येतात.)

पंडितराव: शेवटी शालिनीनं खिडकीतून खाली उडी मारून आत्मघात केलाच... हे शेवटी विधिलिखितच होतं असं म्हणायचं. वजाबाकी शून्यच व्हायची होती तिच्याच म्हणण्याप्रमाणे. परमेश्वरा, परमेश्वरा... (थरथरत्या आवाजात म्हणतात)

*वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि।*
*तथा शरीराणि विहाय जीर्णान्यिन्यानि संयाति नवानि देही॥*

शेवटी त्यांनी स्वीकारलेला पॅलिंड्रोमच खरा ठरला. मुलाच्या मृत्यूनं त्यांना स्वतःच्या मृत्यूचीच दिशा दाखवली—नाशाकडून सर्वनाशाकडे घेऊन जाणारी. आता त्या सर्वांनाच चिरशांती मिळाली असेल! चक्र पूर्ण झालंय्. द व्हील हॅज कम फुल सर्कल अँड आय ॲम हियर! शेवटी मृत्यूच सर्वांना शांती देतोय् तर त्या मृत्यूबद्दल रडायचं कशाला अन् शोक तरी कशाला करायचा? शेक्सपियर, अरे तू खरंच म्हणून गेलायस्:

a

*Fear no more the heat o' the sun,*
*Nor the furious winter's rages;*
*Thou thy worldly task hast done,*
*Home art gone, and ta'en thy wages:*
*Golden lads and girls all must,*
*As chimney-sweepers, come to dust.*

परमेश्वरा, खरोखरीच या तुझ्या पॅलिंड्रोमची लीला अगाध आहे. यू आर अ ग्रेट लेव्हलर! आणि ईश्वरा, माझी एकच प्रार्थना ऐक. तिघांच्या आत्म्यांना शांती दे. अन् हो, मनुष्याला नाशाच्या पॅलिंड्रोम कडे नेणाऱ्या प्रवृत्तीपासून दूर ठेव म्हणजे अशी आयुष्यं व्यर्थ नाश पावणार नाहीत.

**(पडदा पडतो)**

—समाप्त—



औद्योगिक क्षेत्रात तंत्रज्ञ, नवकल्पक, संशोधक अशी ओळख असलेले **श्रीनिवास शारंगपाणी**, शाळा-कॉलेज आणि कंपन्यांसह इतर संस्थांमध्ये व्याख्याते म्हणून ओळखले जातात. त्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ते लेखकही आहेत. जशी त्यांनी मराठी / इंग्रजी कादंबऱ्या, कथा तसंच कविता / गीतं या वाङ्मयप्रकारात मुशाफिरी केली आहे तशी त्यांनी इंग्रजी-मराठी नाटकेही लिहिली आहेत. महान् गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्यावरच्या 'डेथ ऑफ अ मॅड मॅथेमॅटिशियन' या इंग्रजी नाटकाचा हिंदी आणि मराठी अवतार लोकांना आवडला. नाटक या प्रकाराचं त्यांना खूप आकर्षण आहे. 'पॅलिंड्रोम' हे त्यांचं पहिलं नाटक त्यांनी ८०च्या दशकात लिहिलं. एकूण सहा मराठी आणि दोन इंग्रजी नाटकं लिहूनही त्यांचा हा प्रवास चालूच आहे.

श्रीनिवास शारंगपाणी.
७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
बँक ऑफ इंडियासमोर,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com